**सुविचार**

स्वतन्त्रता के नियमों को स्वीकार करने के वाद ही आपको स्वतन्त्र कहलाने का अधिकार है।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. २० सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-२०४ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# अमेरिकची पॉलिसी रेट मध्ये कपात, जागतिक महागाई नियंत्रणात

नवी दिल्ली : अमेरिकेत जवळपास ४ वर्षांच्या दीर्घ काळानंतर फेडरल रिझर्व्हने मोठा निर्णय घेत पॉलिसी रेटमध्ये कपात केली. व्याजदर अंदाजानुसार ५० बेसिस पॉइंट्स किंवा ०.५० टक्क्यांनी कमी करण्यात आले आहेत. महागाई नियंत्रणात आल्याचं सांगत हा निर्णय घेतला गेला. त्यानंतर सर्व प्रकारची कर्जे कमी होण्याची अपेक्षा आहे. पण तुम्हाला माहिती आहे का? कुठल्याही देशात पॉलिसी रेट अथवा रेपो रेट लोन ईएमआयवर कसा परिणाम करते? रेट कटचा सामान्य माणसांसाठी काय अर्थ असतो हे बघणे महत्वाचे आहे.

महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्रीय बँका मार्केटमधील लिक्विडिटी कमी करण्यासाठी पॉलिसी रेट वाढविण्याचे पाऊल उचलतात ज्यातून इतर बँका कर्जाचे दर वाढवते. त्यामुळे ग्राहक कमी कर्ज घेतात. महागाई असल्याने अर्थव्यवहारातून कॅश फ्लो घसरतो आणि मागणी कमी होते. त्यामुळे महागाई नियंत्रणात येते. त्यानंतर बँका दर कमी करण्यावर भर देतात. समजा, तुम्ही ३० लाख होम लोन २० वर्षासाठी ६.७ टक्के व्याजदराने घेतले आहे. त्यावेळी रेपो रेट ४ टक्के स्थिर होता. यानुसार तुमच्या व्याजदरावर ईएमआय दर महिना २२, ७२२ रुपये होतो. परंतु आता रेपो रेट ६.५ टक्के आहे म्हणजे २.५० टक्के वाढ झाली, तो रेपो रेटनुसार बँका कर्जावरील व्याजदर वाढवून ९.२ टक्के करतात. त्यामुळे तुमचा ईएमआय वाढून २७,३७९ रुपये होईल. याचा अर्थ तुमच्या मासिक खर्च



ईएमआयवर होणा-या खर्चात अतिरिक्त ४,६५७ रुपयांची भर पडेल, तर रेपो रेट कमी होताच ईएमआयही कमी होतो.

**रेपो रेटचा कर्जावर परिणाम**

जेव्हा रेपो रेट बदल केला जातो, तेव्हा कर्ज स्वस्त होण्याची अपेक्षा असते. बँका आता कर्जाचे व्याजदर कमी करणार असे बोलले जाते. व्याजदर हे तुमच्या कर्जाशी जोडलेले असते. होम लोन, पर्सनल लोन, ऑटो लोनसह इतर सर्व बँकिंग लोन हे रेपो रेटशी कनेक्टेड असते. रिझर्व्ह बँक इतर बँकांना ज्या दराने कर्ज देते तो दर म्हणजे रेपो रेट. त्यामुळे रेपो दर वाढला की बँकांना रिझर्व्ह बँकेकडून महागड्या दराने कर्ज मिळते. त्यामुळे सर्वसामान्यांना मिळणारे कर्जही महाग होते. त्याच वेळी, जेव्हा ते कमी केले जाते, तेव्हा बँका त्यांच्या कर्जाचे व्याजदर देखील कमी करतात आणि यामुळे कर्जाचा ईएमआय देखील त्यानुसार कमी होऊ शकतो.

**अमेरिकेनंतर आरबीआयवर दबाव?**

अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या घोषणेत यूएस फेडने व्याजदर ४.७५ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केले आहेत, परंतु आगामी काळात आणखी कपात करण्याचे संकेत दिले आहेत. याआधी पॉलिसी रेट ५.२५ टक्के ते ५.५ टक्के दरम्यान होता. व्याजदर कपातीची घोषणा करतानाच व्याजदरात कपात करण्यात कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही असे फेडरल रिझर्व्हचे प्रमुख जेरोम पॉवेल म्हणाले.

**व्याजदराचा महागाईशी थेट संबंध**

अमेरिका असो वा भारत किंवा अन्य कुठलाही देश, सर्वांना महागाई आणि व्याजदर यांचा समतोल साधावा लागतो. जगात केंद्रीय बँका महागाई कमी करण्यासाठी रेपो रेटमध्ये बदल करतात. सामान्यत: रेपो रेटमध्ये कपात करून महागाई कमी (पान ७ वर)

# भाजपाच्या जाहिरनाम्यात २० आश्वासने तर काँग्रेसने दिली जनतेला ७ आश्वासने

रोहतक : हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने आज, गुरुवारी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. हे संकल्पपत्र पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा आणि मुख्यमंत्री नायब सैनी यांनी रोहतक येथे जारी केले.



भाजपाने आपल्या जाहिरनाम्यात हरियाणातील २ लाख तरुणांना सरकारी नोकऱ्या देणार असल्याचे म्हटले आहे. याशिवाय सर्व महिलांना दरमहा २१०० रुपये दिले जातील. तसेच घर गृहिणी योजने च्या माध्यमातून ५०० रुपयांना सिलिंडर दिला जाईल. पेन्शनमध्ये वाढ केली जाईल, नवीन वंदे भारत गाड्या सुरू करणार, ग्रामीण भागातील प्रत्येक महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कूटर दिल्या जातील, हरियाणाला जागतिक शिक्षणाचे केंद्र बनवणार. याशिवाय इतरही अनेक आश्वासने भाजपाने दिली आहेत.

दुसरीकडे काँग्रेसने हरियाणातील जनतेला ७ आश्वासने दिली आहेत. काँग्रेसच्या संकल्प पत्रानुसार राज्यात सरकार आल्यास महिलांना लाडो लक्ष्मी योजनेंतर्गत २१०० रुपये दिले जातील. शहरी आणि ग्रामीण भागात ५ लाख घरे, एमएसपीवर घोषित झालेल्या २४ पिकांची खरेदी केली जाईल. प्रत्येक कुटुंबासाठी १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळतील. तसेच ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचारांची सुविधा मिळेल. राज्यातील २ लाख तरुणांना सरकारी नोकरी तसेच ५ लाख तरुणांना रोजगाराच्या इतर संधी आणि नॅशनल अप्रेंटिस प्रमोशन योजनेतून मासिक स्टायपेंड दिले जाईल. लहान मागास जातींसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळे बनवणार. निवृत्ती वेतनामध्ये वाढ करणार. दक्षिण हरियाणात आंतरराष्ट्रीय (पान ७ वर)

# मुस्लिम समाजाविषयी गरळ ओकणाऱ्या नेत्यांवर अजित पवार नाराज

मुंबई : प्रतिनिधी- गेल्या काही दिवसांमध्ये भाजपच्या कट्टर हिंदुत्वाचा पुरस्कार करणा-या नेत्यांकडून मुस्लिम समाजाविषयी करण्यात येत असलेल्या वक्तव्यांवर उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रचंड नाराज असल्याची माहिती समोर आली आहे.

मुस्लिमविरोधी वक्तव्ये करणा-या या नेत्यांच्या भूमिकेचा फटका आगामी विधानसभा निवडणुकीत बसू शकतो. याची दखल घेत अजित पवार आता या भाजप नेत्यांविरोधात थेट दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

नितेश राणे यांच्यासह भाजपचे काही नेते वारंवार मुस्लिम समाजाबाबत आक्षेपार्ह टिप्पणी करून धार्मिक तेढ निर्माण करत आहेत. या नेत्यांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे दिल्लीतील भाजप पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचा जो मूळ मतदार आहे, त्यामध्ये अल्पसंख्याक समुदायाचा समावेश आहे. अजित पवार आपल्या भाषणांमधून वारंवार आपण अल्पसंख्याक समाजाच्या बाजूने आहोत, असा विश्वास देत असतात. मात्र, गेल्या काही दिवसांमध्ये भाजप नेते नितेश राणे सातत्याने मुस्लिम समाजाला अंगावर घेणारी वक्तव्यं आणि आव्हान देण्याची भाषा केली जात आहे. अजित पवार हे भाजपसोबत सत्तेत आहेत.

त्यामुळे भाजप नेत्यांच्या मुस्लिम समाजाविषयीच्या वक्तव्यांबाबत अजित पवार यांची भूमिका काय, असा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे भाजप पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून ही बाब त्यांच्या कानावर घालणार आहेत. भाजप नेत्यांच्या वक्तव्यांकडे लक्ष द्यावे, असे अजितदादा गटाकडून सांगितले जाणार आहे. या माध्यमातून आपण अजूनही मुस्लिम (पान ७ वर)

# खाद्यतेल महागले

मुंबई : ऐन दसरा, दिवाळीच्या तोंडावर खाद्यतेलाच्या किमतींमध्ये १० ते २० रुपयांची वाढ झाली आहे. वाढत्या दरामुळे गृहिणींचे बजेट बिघडलेले दिसत आहे. आता स्वयंपाकघरातील फोडणी महाग झाली आहे. महिन्याभरापूर्वी १२० रुपये किलो दराने मिळणारे सोयाबीन तेल आता १४० ते १५० रुपये किलो दराने मिळत आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने तेलावरील एक्साईज ड्युटी वाढवल्यामुळे ही दरवाढ झाली आहे. भारत वनस्पती तेलाची बरीचशी मागणी आयातीद्वारे पूर्ण करतो. पामतेल, सोयाबीन आणि सूर्यफूल तेलाची आयात केली जाते. मात्र, त्या त्या देशातील परिस्थितीनुसार पुरवठा कमी झाला किंवा दरवाढ झाली तर त्याचा थेट परिणाम दरांवर होतो.

महिन्याला काटकसर करून किराणा घेतला जातो. महिन्याला साधारणत: चार ते पाच लिटर तेल लागते. आता तेल विकत घेताना वाढलेले दर पाहून धक्काच बसला. दरवाढीमुळे महिन्याच्या बजेटमध्ये आणखी वाढ झाली आहे, असे गृहिणी कल्पना मिरेकर यांचे म्हणणे आहे. एक्साईज ड्युटी वाढल्यामुळे तेलाचे भाव वाढले आहेत. ग्राहकांनी किराणा व्यावसायिकांबाबत गैरसमज करू नयेत. घाऊक बाजारामध्ये प्रति दहा किलोमागे २० ते ३० रुपयांची वाढ झाली आहे. मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये २ ते ४ लिटरप्रमाणे तेलाची खरेदी केली जाते. त्यामुळे त्या ग्राहकांना प्रतिलिटर १० ते २० रुपये दरवाढ सहन करावी लागत आहे. योगेश आलटकर, घाऊक व्यापारी.

**गृहिणींसाठी डोकेदुखी-**

तेलाच्या दरात टप्प्याटप्प्याने होणारी दरवाढ गृहिणींसाठी डोकेदुखी ठरली आहे. राज्य सरकारने सर्वसामान्यांच्या विचार करून दरवाढीसंदर्भात निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा गृहिणींमधून व्यक्त होत आहे.

महागाईमुळे सर्वसामान्य कुटुंबीयांना दर महिन्याला खर्चाचे नियोजन करणे अवघड होत चालले आहे. दैनंदिन वापरात येणा-या वस्तूंमागे एक्साईज ड्युटी वाढवून भाववाढ झाली तर आम्ही जगायचे कसे? असा प्रश्न महिलावर्ग विचारत आहे.

# योजना काय देता कांद्याला भाव द्या

अमरावती : प्रतिनिधी- राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. त्यासाठी महायुतीसह महाविकास आघाडीची जोरदार तयारी सुरू आहे. महायुतीकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जोरदार प्रचार केला जात आहे. यावर आता महायुतीला घरचा आहेर मिळाला आहे. आम्हाला योजना काय देता आमच्या कांद्याला भाव द्या, असे म्हणत आमदार बच्चू कडू यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे.

दरम्यान, शेतक-यांच्या कांद्याला भाव मिळत नसल्यामुळे राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. बच्चू कडू म्हणाले की, आमच्याकडे कांदा असल्यावर हस्तक्षेप करत नाही. शेतमालाचे भाव पडतात तेव्हा एकही खासदार, आमदार बोलत नाहीत. तेव्हा तुम्हाला तुमचा पक्ष प्रिय असतो.

आता आम्ही तुम्हाला तुमची जागा दाखविणार, तुम्ही आम्हाला रडविले, आता आम्ही तुम्हाला रडवणार आहोत. काँग्रेस व भाजपने निर्माण केलेली लुटणारी व्यवस्था उखडून फेकणार आहोत. तुम्ही काय आम्हाला योजना देतात, आमच्या कांद्याला भाव द्या, आम्ही प्रत्येक आमदाराला वर्षाला ४ क्विंटल कांदा, मुख्यमंत्र्यांना १५ क्विंटल तर पंतप्रधानांना ट्रकभर कांदा मोफत देऊ, असा घणाघात बच्चू कडू यांनी केला आहे.

## आंध्रात फक्त ९९ रुपयांत मिळणार दारू

अमरावती : मद्यप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आहे. आंध्र प्रदेशच्याचंद्राबाबू नायडू सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मद्यप्रेमी लोकांसाठी नवीन मद्य धोरण आणले आहे. याअंतर्गत १ ऑक्टोबरपासून दारू दुकानाचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच चंद्राबाबू नायडू यांच्या सरकारने दारू विक्री आणि वितरण धोरणातही मोठा बदल केला आहे. विशेष म्हणजे या धोरणात मद्यप्रेमींना अनेक सवलती देण्यात आल्या आहेत. आंध्र प्रदेशातील मद्यप्रेमींना आता स्वस्त दारूची व्यवस्था सरकारने केली आहे. स्वस्त दारू ९९ रुपये किंवा त्यापेक्षा कमी दरात मिळेल. तसेच, दारुची दुकाने उघडण्याची वेळ ३ तासांनी वाढवली जाणार आहे.

# ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे यांना पत्रकारिता क्षेत्रातील 'बाळशास्त्री जांभेकर महाराष्ट्र भूषण' पुरस्कार




लातूर / प्रतिनिधी- गेल्या चाळीस वर्षांपेक्षाही अधिक काळ मराठी पत्रकारितेत रमलेले राज्यातील ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे यांना पत्रकारितेतील दीर्घकालीन व भरीव योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या लातूर जिल्हा शाखेने नुकत्याच आयोजिलेल्या भव्य सोहळ्यात ' बाळशास्त्री जांभेकर महाराष्ट्र भूषण' पुरस्कार पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे सहअध्यक्ष हभप पू. गहिनीनाथ महाराज यांच्या शुभहस्ते व खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

मराठवाडा मुक्ती दिनाचे औचित्य साधून येथील दयानंद सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोकरे ( सांगली ) होते. अन्य प्रमुख अतिथींमध्ये ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखेडे ( नवी दिल्ली), शिक्षणतज्ञ डॉ. विठ्ठल कांगणे, संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, जिल्हाध्यक्ष अशोक देडे , अशोक हनवते आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना हभप गहिनीनाथ महाराज यांनी संतवचने उद्धृत करीत , संतांनी कर्तव्य श्रेष्ठ असल्याचे सांगितले. आधी स्वतःला सुधारा व मग समाजाला सुधारा असा संतोपदेश लक्षात घेतला पाहिजे, असे ते म्हणाले. तर, संजय भोकरे यांनी संघटना पत्रकारांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचे सांगितले.अशोक वानखेडे यांनी , पत्रकारांनी विरोधी पक्षाची भूमिका निभावली पाहिजे, असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी जयप्रकाश दगडे, प्रा. विठ्ठल कांगणे यांचीही यथोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांनी, सूत्रसंचालन प्रा.यू.डी.गायकवाड यांनी, तर आभारप्रदर्शन महादेव डोंबे यांनी केले. समारंभाच्या यशस्वितेसाठी अफसर कारभारी, लिंबराज पन्हाळकर, सुधाकर फुले, अशोक हनवते आदींनी परिश्रम घेतले.

## कलम ३७० बाबत

# पाक,काँग्रेस आणि एनसीपी एकत्र

इस्लामाबाद : जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारामध्ये कलम ३७० हा कळीचा मुद्दा बनलेला आहे. या वादात आता पाकिस्ताननेही उडी घेत धक्कादायक दावा केला आहे. काश्मीरमध्ये कलम ३७० आणि ३५ ए पुन्हा लागू करण्याच्या मुद्यावर पाकिस्तान आणि काँग्रेस-नॅशनल कॉन्फ्रन्स आघाडी ही एकमेकांसोबत आहे, असा दावा पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी केला आहे. पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांनी केलेल्या या दाव्यानंतर भाजपाने काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फ्रन्स यांच्या आघाडीवर टीका करण्यास सुरुवात केली आहे.

पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांचा एक



व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आसिफ यांनी जियो न्यूजचे पत्रकार हामिद मीर यांच्याशी बोलताना सांगितले की, जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० आणि कलम ३५ ए पुन्हा लागू करण्याच्या मुद्यावर पाकिस्तान आणि नॅशनल कॉन्फ्रन्स-काँग्रेस आघाडी हे एकत्र आहेत. दरम्यान, पाकिस्तानच्या या दाव्यावर काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फ्रन्सकडून अद्याप कुठलीही प्रतिक्रिया आलेली नाही. दरम्यान, काँग्रेसने जम्मू काश्मीरच्या आपल्या जाहीरनाम्यामधून कलम ३७० बाबत कुठलेही विधान केलेले नाही, तसेत आश्वासनही दिलेले नाही. मात्र जम्मू काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळवून देण्याचे आश्वासन मात्र काँग्रेसकडून देण्यात आले आहे.

**भाजप आक्रमक**

पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या या दाव्यानंतर भाजपाकडून आक्रमक प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली आहे. पाकिस्तानसारखा एक दहशतवादी देश काश्मीरच्या मुद्यावर (पान ७ वर)

# किल्लारी येथील कल्याणकारी योजनांच्या जागराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




लातूर, /प्रतिनिधी- विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्गाच्या विकासासाठी राज्य शासनाकडून विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्यासाठी शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, तांडा वस्तीच्या विकासासाठी निधी, घरकुल योजना, विविध महामंडळांच्या माध्यमातून अर्थसहाय्य देण्यात येत आहे. यामाध्यमातून बहुजन समाजाच्या कल्याणाचा शासनाचा प्रयत्न असून या योजनांसाठी राज्य शासन निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही इतर मागास बहुजन कल्याण व गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

किल्लारी येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना परिसरात मउत्कर्ष बहुजनांचा, संकल्प बहुजन कल्याणाचाफ या संकल्पनेतून आयोजित विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास वर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा जागर कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ना. सावे बोलत होते. आमदार योगेश टिळेकर, आमदार अभिमन्यू पवार, माजी मंत्री बसवराज पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक दिलीप राठोड, सहायक संचालक शिवकांत चिकुर्ते, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, भटके विमुक्त विकास परिषदेचे कार्यवाह नरसिंग झरे यावेळी उपस्थिती होते.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने ग्रामीण भागातील ९७८ आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जात आहे. धनगर समाजातील मुलांना नामांकित शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे, यासाठी यावर्षी १६ हजार ५०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यास मंजुरी दिलेली आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्गाच्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत असल्याचे ना. सावे यांनी सांगितले.

(पान ७ वर)

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या उन्मेष वार्षिकांकाचे प्रकाशन



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या उन्मेष २०२३-२४ व दयानंद कला महाविद्यालयाच्या वेध २०२३-२४ या वार्षिकांकाचे प्रकाशन दि.१७ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.याप्रसंगी संस्थेचे नियामक मंडळ सदस्य विशाल लाहोटी,कुणाल कोरे,अशोक पाटील तसेच प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड,प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड,दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्यडॉ.प्रशांतमान्नीकर,दयानंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पुनम नाथानी,दयानंद फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,उपप्राचार्य प्रा.दिलीप नागरगोजे,पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, दयानंद कला महाविद्यालयातील पर्यवेक्षक प्रा.प्रशांत दीक्षित,वेधचे मुख्य संपादक डॉ.बालाजी घुटे व संपादक टीम व उन्मेषचे मुख्य संपादक व इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित तसेच संपादक मंडळातील डॉ. चंद्रशेखर स्वामी,डॉ.गजानन बने,डॉ.विजेंद्र चौधरी,डॉ. रामशेट्टी शेटकार,प्रा.मनीषा बाजपाई,प्रा.शैलेश सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते उन्मेष २०२३-२४ उत्कृष्ट लेखनासाठी मराठी विभागातून पर्णवी ढवारे व शितल राठोड,इंग्रजी विभागातून श्रेया मुंडे व अमृता मलवाडे आणि हिंदी विभागातून दिक्षा कांबळे व श्रेया पुरी यांना प्रत्येकी ०१ हजार रुपये रोख रक्कम अशी एकूण ०६ हजार रुपयांची बक्षीसे देण्यात आली. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनीही उन्मेष व वेध दोन्हीही वार्षिक अंकाचे कौतुक केले आणि शुभेच्छाही दिल्या. उन्मेष वार्षिक अंक तयार करण्यासाठी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांचे व वेध (पान ७ वर)

# अहमदपूरात मराठवाडा मुक्ती दिन उत्साहात साजरा
## उपजिल्हाधिकारी सौ. मंजुषा लटपटे यांच्या हस्ते ध्वजारोहण



अहमदपूर दि.१९बालाजी कारामुंगीकर): अहमदपूरातर मराठवाडा मुक्ती दिन उत्साहात साजरा करण्यात आला असुन उपजिल्हाधिकारी सौ.मंजुषा लटपटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर येथे दि.१७ सप्टें. २०२४ रोजी मराठवाडा मुक्ती दिनाचे शासकीय ध्वजारोहण जिल्हा परिषदेचे मैदानावर उपजिल्हाधिकारी सौ मंजुषा लटपटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी तहसीलदार उज्व-लाताई पांगरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर, पोलीस निरीक्षक डी. डी. भुसनूर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक देवेंद्र देवणीकर, माजी नगराध्यक्ष सरस्वती ताई कांबळे, डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, मधुकर मदने, प्राचार्य गजानन शिंदे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी सूत्रसंचालन राम तत्तापूरे यांनी तर आभार गौरव चवंडा यांनी मांनले. सोहळ्याचा शुभारंभ राष्ट्रगीत, त्यानंतर राज्य गीत आणि मराठवाडा गीत सादर करून उपस्थिताना स्वच्छतेची शपथ उपजिल्हाधिकारी सौ मंजुषा लटपटे यांनी दिली.

सदरील सोहळा यशस्वी करण्यासाठी महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम

# अहमदपूरच्या ओम शांती केंद्रात अनोखा उपक्रम
## प्रकृती पर्यावरण व आपदा प्रबंधन जनजागृती अभियानात सहभागी होण्याचे पानिपतचे राजयोगी भारत भूषण भाई यांचे अवाहन

अहमदपूर दि.१९(बालाजी कारामुंगीकर): अहमदपूरच्या ओम शांती केंद्रात अनोखा उपक्रम झाला असुन प्रकृती पर्यावरण व आपदा प्रबंधन जनजागृती अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे असे अवाहन पानिपतचे राजयोगी भारत भूषण भाई यांनी केले.




ते अहमदपूर दि.१८ सप्टेंबर२४ रोजी ईश्वरीय विश्व विद्यालयात आयोजित प्रकृती पर्यावरण व आपदा प्रबंधन जनजागृती अभियान सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष सौ. अश्विनीताई कासनाळे ह्या होत्या. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर, राज योगिनी सुप्रिया बहन, राज योगिनी छायाबहन, ब्रह्मकुमार महेश भाई, ब्रह्मकुमार रामनाथ भाई यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना भारत भूषण भाई म्हणाले की, आपल्या देशात सबंध मानव जातीने पर्यावरण संतुलनाची म्हणावी तशी काळजी न घेतल्यामुळे सबंध पृथ्वीतलावर समस्या निर्माण झालेल्या असून त्या समस्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी घरा-घरात आणि मनामनात पर्यावरण संतुलनाविषयी सजगता बाळ-गावी आणि ओम शांती केंद्राच्या वतीने चालविण्यात आलेल्या प्रकृती पर्यावरण व आपदा प्रबोधन जनजागृती अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे असे जाहीर आवाहन पानिपतचे राजीयोगी भारत भूषण भाई यांनी केले.

यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष कल्याणकर म्हणाले की, आत्मशांतीसाठी ईश्वराचे नामस्मरण करणे गरजेचे असल्याचे सांगून भविष्यात आपत्ती व्यवस्थापनासाठी सुद्धा मानवाने जागृत राहिले पाहिजे असे सांगितले.

यावेळी राज योगिनी सुप्रिया दीदी, माजी नगराध्यक्ष सौ. अश्विनीताई कासनाळे यांचे मनोगत पर भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजयोगिनी छाया बहिणजी यांनी सूत्रसंचालन राजयोगिनी सुल-क्षणा बहिण यांनी तर आभार जितूभाई यांनी मांनले.

या सोहळ्याला उद्योजक विजय गुंडाळे, राम तत्ताप-ुरे, जीवनराव कराड, श्रीमती खफ्रंजना (पुणे) आंधळे, डॉ. बालाजी कारामुंगीकर, आशा रोडगे, महादेव खळूरे यांच्यासह महिला व पुरुष साधकांची उप-स्थिती होती. यावेळी ब्रह्मकुमार महेश भाई यांनी पर्यावरणाची उपस्थितांना शपथ दिली. कार्यक्रमाचा समारोप पर्यावरण गिताने करण्यात आला.

# दयानंद विद्यालयात तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धांचे उद्घाटन



हडोळती १९ (नागसेन गायकवाड) हडोळती तालुका अहमदपूर येथील दयानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रा.पी. टी. पवार सरांच्या अमृत महोत्सवी वर्ष या निमित्ताने तालुकास्तरीय शालेय खो-खो मुले-मुली या खेळांचे उद्घाटन क्रीडा महर्षी प्रा. गणपतराव माने यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पी.टी.पवार सर हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर निलेश भैय्या पवार,डॉक्टर दीपक बच्चेवार,प्राध्यापक शरद माने सर,श्री ईश्वर जोगदंड सर ,श्री व्यंकटरावजी मुळके सर, सौ.शकुंतला ताई भोगे(सरपंच, हडोळती),सौ इंदुताई पवार(उपसरपंच,हडोळती), श्री गणपत कोडगावे सर ,श्री अर्जुन कानवटे सर, हंबीर महेश मधुकर (सरपंच हिप्पळगाव ) एच.पी.आरदवाड (जमादार साहेब हडोळती) मोरे एम.डी. सर (मु.अ.प्रशाला हडोळती ),भारत घेरे सर, शेख सर (माजी विस्ताराधिकारी), मोहन पाटील सर (मु.अ.केंद्रीय प्राथमिक शाळा, हिपळगाव),डॉक्टर गोप-ाळ जाधव,नसरीन मॅडम (मु.अ. अलकादीर उर्दू शाळा,हडोळती) इत्यादी मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी सदरील स्पर्धेत एकूण २० शाळांनी सहभाग घेतला होता. १७ वर्ष मुले तालुक्यातून प्रथम येण्याचा मान सरस्वती विद्यालय कुमठा या संघाने मिळविला, तर १४ वर्षे मुले प्रथम येण्याचा मान सरस्वती विद्यालय कुमठा या संघाने मिळविला, १७ वर्ष द्वितीय येण्याचा मान आश्रम शाळा धसवाडी या संघाने मिळविला,तर १९ वर्षे वयोगटातील मुलांनी कर्मयोगी तुळशीराम कनिष्ठ महाविद्यालय हडोळती या संघाने प्रथम येण्याचा मान मिळविला.

तसेच १४ वर्षे वयोगटात मुले दयानंद विद्यालय हडोळती या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. सदरील खेळासाठी पंच म्हणून मुचेवाड बी.पी.,मुंडे सर, काशिम सर,प्रा.वाघमारे गौतम सर, प्रा.गोविंद कलवले सर,प्रा. ढोबळे सर, येरमे एल.व्ही. सर यांनी काम पाहिले,तर सेवानिवृत्त शिक्षक बोडके चंद्रकांत सर यांनी खेळाचे धावते समालोचन केले.

# राजकारातील प्रस्थापितांच्या विरोधात मी विधानसभेला अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुक लढवणार - मा.जि.प सदस्य माधव जाधव

अहमदपूर दि.१९(बालाजी कारामुंगीकर):आगामी काळात होणाऱ्या विधान सभेच्या निवडणूकीसाठी अहमदपूर चाकूर मतदार संघात एक आमुलाग्र बदल घडवण्याच्या उद्देशाने मतदार संघातील गेली अनेक वर्ष राजकारणातील प्रस्थापितांच्या विरोधात धर्मनिरपेक्ष राजकारण करून सर्व सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मी राष्ट्रवादी क्रॉग्रेस पक्षाला (अजित पवार गट ) सोड चिठ्ठी देत असुन येणाऱ्या विधान निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणुन निवडणुक लढवण्याचा निर्धार माजी जि.प सदस्य माधव जाधव यांनी दि १७ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषद घेऊन केला यावेळी त्यांचे मोठे बंधु माणिकराव जाधव त्यांच्या सोबत पत्रकार परिषदेत उपस्थित होते.

पुढे बोलताना माधव जाधव म्हणाले की, आमचे कुटुंब पुर्वी हैद्राबाद येथे राहत होते आम्ही अत्यंत हालाखीच्या परिस्थित जिवन जगले असुन माझे आई वडील तर विट भट्टीवर मोल मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असत मि देखील अहमदपूर येथील डॉ सांगवीकर यांच्या हॉस्पीटल मध्ये तीनशे रूपयांच्या महीनेवारी-वर कम्पॉडर म्हणुन काम केले आहे मी इ.सन २०१७ मध्ये सन्मानिय शरदचंद्र पवार साहेब यांच्या मुळ राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षातुन जि.प मतदार संघ खंडाळीतुन निवडणुक लढवुन जिंकुन येऊन पाच वर्षे माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागा-तील गोरगरीब जनतेचे प्रश्न जिल्हा परिषदेच्या माध्यमातुन मांडून प्रामाणिक पणे ते सोडवण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगीतले. बारा बलुतेदार आठरा पगड जा-तीतील लोकांना त्यांचे प्रश्न ऐरणीवर घेऊन ते सोडवण्यासाठी त्यांचा आवाज शासनापर्यंत पोहचवण्यासाठी सर्व सामान्य



धर्मनिरपेक्ष लोकप्रतिनिधिची गरज असुन जनतेनेच मला प्रस्थापितांच्या विरोधात उभे राहण्यासाठी ताकत दिली असुन निवडूण देण्याचे ठरवले आहे मी पुरोगामी विच-ाराचा वारसा घेऊन जनतेसाठी उभा राहणार आहे. जनसामान्यांनातला आमदार कसा असतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे सर्वांना परिचित असणारे स्वर्गीय गणपतराव देशमुख व आपल्या मतदार संघातील ऍड. रामचंद्रराव पाटील, स्वर्गीय भगव-ानराव नागरगोजे(अण्णा) माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांच्या आदर्श विचाराचा वारसा माझ्या समोर असून सर्व सामान्याचा लोकप्रतिनिधी कसा असावा हे या लोकप्रतिनिधीनी दाखवून दिले होते. त्याचाच विचार घेऊन मतदार संघातील राहिलेले कामे पूर्ण करणार असून माझा कोणीही प्रतिस्पर्धी नसून मी कोणाला पाढण्यासाठी किवा कोणाला विजयी करण्यासाठी उभा नसून मी पुरोगामी जनतेचा व सर्व सामान्य जनतेचा लोकप्रतिनिधी म्हणून विजयी झाल्यास कार्य करणार आहे.

माझे जाधव परिवारासोबतचे संबध पूर्वी होते तसेच कायम राहणार असून ते पूढे ही कायम राहातील. विधान सभेला उभा राहाण्याचा निर्णय मी स्वता घेतला नसून तो प्रस्थापित्यांच्या विरुध्द मतदार संघातील सामान्या तल्या सामान्य जनतेने हा निर्णय घेण्यास भाग पाडले आहे. मी निवडून आल्यानंतर पुरोगामी विचारांचा वारसा घेऊन चालणाऱ्या पक्षासोबतच काम करणार आहे. मला कोणावर टिका करायची नाही, माझ्यावर सोशल मिडिया मधुन माझ्यावर काहीजन वैयक्तिक खालच्या दर्जाची टिका टिपनी करत आहेत. त्यांच्या टिकेला प्रतिउत्तर न देता जनता त्यांच्या टीकेला येण्याऱ्या विधान सभेत मताच्या रूपाने उत्तर देणार आहे. मी माझ्या आई वडिलांना देव मानतो माझ्या आई वडिलांची शपथ घेऊन सांगतो की कोणाच्या विरोधात नाही. छत्रपती शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, अहिल्यादेवी होळकर यांचा वारसा घेऊन पुढे आलोय माधव जाधव हा माध-वराव जाधव किंवा साहेब होणार नाही सर्व सामान्यांना सहज उप-लब्ध होणारा मी लोकप्रतिनिधी आसणार आहे. माझा सगळ्यात मोठा आधार माझे आई वडील माझा पाठीराखा भाऊ. मला निवडून आणायला असंख्य हात आहेत अहमदपूरची जनता सर्वसामान्याच्या पाठीमागे उभे राहाणार आहेत असेही ते शेवटी म्हणाले. यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना माणिकराव जाधव म्हणाले की, कोणताही निर्णय घरापासून ते जनतेच्या मना-तला असतो. प्रत्येक समाजाला आरक्षणासाठी भांडावे लागत आहे यांचे कारण बेरोजगारी,जनतेचे अनेक प्रश्न त्यांच्या हाताला काम नाही म्हणून जनतेचे प्रश्न शासनाने सोडवावेत, आम्ही कुठल्या पक्षाचा विचार करणार नाही. आम्ही अपक्ष म्हणून थांबणार आहेत.

## लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ
(मल्टिस्टेट को-ऑप सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन, कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.३१३० क.वि.१८/०९/२०२४

रेणूका भवन,
रेणूका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२अ*२ब पुष्पक हॉटेल जवळ,
पाईप लाईन रोड सावेडी अ.नगर,
अहमदनगर - ४१४००१

### जाहीर नोटीस

श्री रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप, क्रेडिट,
सोसायटी लि. अहमदनगर - अर्जदार
विरुध्द

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| ३५४९/२०२४ | अर्जदार श्री / श्रीमती - सुरनर संजय जनार्धन<br>रा. - सुरनर जनार्धन, सुनेगाव (सांगवी) अहमदपूर<br>ता. अहमदपूर जि. लातूर<br>जामीनदार श्री/श्रीमती वडेर बंडू प्रल्हाद<br>रा. वडेर प्रल्हाद सुनेगाव (सांगवी) अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर<br>जामीनदार श्री / श्रीमती - वडेर वंदना किशन<br>रा - वडेर किशन सुनेगाव (सांगवी)अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर | |

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांचे तुमचे विरुद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक २८/०९/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी / एकतर्फी हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी सदर नोटीस माझ्या सही व शिक्यानीशी दिले असे.

सही/शिक्का
ॲड. तनपुरे गोविंद दशरथ
लवाद अधिकारी

# ओबीसीचे १०० आमदार निवडून येणे काळाची गरज -प्रा.लक्ष्मण हाके

अहमदपूर दि.१९बालाजी कारामुंगीकर): ओबीसी, अल्पसंख्याक, भटक्या,दलीत समाजानी एकसंघ होऊन महाराष्ट्रात ओबीसीचे १०० आमदार निवडून आणने ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन ओबीसी योध्दा प्रा. लक्ष्मण हाके यांनी अहमदपूर येथील महायल्गार मेळाव्यात केले.






अहमदपूर व चाकूर तालुक्यातील सर्वराजकीय पक्षातील ओबीसी समाज बांधवांच्या पुढाकारातून अहमदपूर शहरा-तील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये सकल ओबीसी, अल्पसंख्याक,विमुक्त भटक्या,दलीत समाजाचा विराट असा महायल्गार मेळावा आज संपन्न झाला. मेळाव्याच्या निमित्ताने अहमदपूर शहरात यात्रेचे स्वरूप आले होते.

अहमदपूर विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या निवडणुकीत ओबीसी नेतृत्वानी काळाची गरज म्हणून एकच उमेदवार निवडणूकीत उभा करून निवडून आणा-वा.ओबीसी मतदारांनी कोणत्याही मराठा उमेदवारांला मतदान न करता ओबीसीच्या उमेदवाराच्या पाठीशी भक्कम उभे राहिले पाहिजे.आज महाराष्ट्रात ओबीसी बहूसंख्य असतानादेखील सर्व सत्ता केंद्र मराठा समाजाच्या हाती आहेत. ओबीसी समाजानी मराठा समाजाची गुलामगिरी सोडून ओबीसीचे स्वतंत्र अस्तित्व तयार करण्याचे अहवान प्रा. लक्ष्मण हाके यांनी अहमदपूर येथील ओबीसी अल्पसंख्याक दलित भटक्या विमुक्तांच्या महायल्गार मेळाव्यास संबोधीत करताना केले.

यावेळी नवनाथ आबा वाघमारे यांनी मराठा आरक्षण व मनोज जरांगे यांचा खरपूस समाचार घेतला.

ओबीसी योध्दे प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची अहमदपूर शहरातून उघड्या जिप मधुन भव्य मिरवणूक काढून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, वि. दा. सावरकर, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदरील मेळाव्यास माजी आ. बब्रुवान खंदाडे, गणेश दादा हाके पाटील, डॉ. अशोक सांगवीकर, एन. आर. पाटील, भारत रेड्डी, जिवणकुमार मद्देवाड, ॲड. भारत चामे,सांब महाजन, किशोर मुंडे, बालाजी रेड्डी, अशोक काका केंद्रे, त्रंबक आबा गुट्टे, डॉ. नरसिंह भिकाणे, ॲड.माधवराव कोळगावे,सुरेश मुंडे, चंद्रकांत मद्दे, माधवराव भिंगोले, ज्ञानोबा बडगिरे, कलीमोदीन अहमद, अश्विनीताई कासनाळे,श्रीकांत बनसोडे,सरस्वती कांबळे,आत्माराम डाके, शेषराव राठोड, दिगंबर पोले,महेश बिलापट्टे, सुरेश हाके, ओम पुणे, गोपीनाथ जोंधळे,बालाजी गुट्टे, हणमंत देवकते, दादा उटगे, नाथराव केंद्रे, राम नरवटे, माणीक नरवटे लक्ष्मण मुकुटमोरे, रमाकांत आरनुरे, गजेन्द्र वलसे, हेमंत गुट्टे,रामानंद मुंडे, माणीक कानगुलकर,प्रकाश ससाने, जिवण गायकवाड, पांडू लोहकरे, जबारखा पठाण यांच्या सह अहमदपूर व चाकूर तालुक्यातील वीस ते पंचवीस हजार सकल ओबीसी , अल्पसंख्याक ,विमुक्त भटक्या दलित समाज बांधव महायल्गार मेळाव्यास उपस्थित होता.प्रास्ताविक कु. अफिफा पठाण यांनी केले तर महायल्गार मेळाव्याचे सुत्रसंचालन व आभार गोविंद गिरी यांनी केले.

## तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अहमदपूर यांचे कार्यालय
(दंडनीय / जन्म-मृत्यू विभाग)

### जन्म नोंदणी प्रमाणपत्र जाहीरनामा

जा.क्र. २०२४/दंडनीय/कावि ९८७ दि.१३/०९/२०२४

विषय : जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३/३ अन्वये जन्म नोंदणीचे आदेश होणे बाबत.

### जाहीर प्रगटन

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार विष्णू हरीबा अडाव रा. उन्नी ता. अहमदपूर यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी कायदा अंतर्गत अर्जदार यांचा मुलगी नामे शरण्या विष्णु आडाव यांचा जन्म दि. ०२.०३.२०२० रोजी मौ. उन्नी ता. अहमदपूर येथे राहत्या घरी झाला असल्याने त्यांच्या जन्म तारखेची नोंदणी ग्रामपंचायत कार्यालय उन्नी ता. अहमदपूर जि. लातूर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म-मृत्यू तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कालावधी मध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादर न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये योग्य तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

सही/-
तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार, अहमदपूर

सदरचे जाहीर प्रगटन हे आज दि. १३/०९/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

प्रत : १. ग्रामपंचायत कार्यालय, उन्नी ता. अहमदपूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे प्रगटन नोटिस बोर्डावर डकवून पंचनामा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी. अहवाल मुदतीत प्राप्त न झाल्यास आपली काहीही हरकत नाही असे समजून नियमानूसार पुढील कार्यवाही अनुसरण्यात येईल.

२. अर्जदार विष्णु हरीबा अडाव रा. उन्नी ता. अहमदपूर यांना देऊन कळविण्यात येते कि, सदरच्या जाहीर प्रगटनास दैनिक वृत्तपत्रामध्ये स्वखर्चाने देऊन वृत्तपत्र कार्यालयास सादर करावे.

सही/-
तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार, अहमदपूर

## कबीरवाणी

**क्रोध अग्नि घर घर बढी,**
**जलै सकल संसार ।**
**दीन लीन निज भक्ति जो,**
**तिनके निकट उबार ।।**

**भावार्थ:** संत कबीर सांगतात की, समाजामध्ये प्रत्येकांच्या घरा घरा मधुन क्रोधाग्नी वाढलेला आहे. आणि हे संपुर्ण विश्व त्यात जळून भस्म होत आहे. परंतु जो विनंम्रमपणे आपल्या भक्तीत मंत्रमुग्ध आहे, लीन आहे. त्याच्या संगतीत जीवनाचा उद्धार आहे. म्हणून संत कबीरांनी सांगितले आहे क्रोधावर नियंत्रण असणे खुप आवश्यक आहे. जो व्यक्ती आपलया क्रोधावर नियंत्रण ठेवतो तोच व्यक्ती जीवनामध्ये यशस्वी होतो. या धावपळीच्या युगामध्ये हा दोहा खुप महत्वाचा आहे. छोट्या छोट्या कारणावरुन भांडणे करणारी माणसे आपल्या आवतीभोवती खुप मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. संत कबीरांची किती मोठी दुरदृष्टि होती यावरुन हे दिसुन येते.
आज आधुनिक युगात मानव खुप प्रगती केली आहे मात्र तो क्रोध, मत्सर, व्देश, अहंकार यामध्ये तो रांत्रदिवस जळत आहे. यासाठी हे सर्व निष्फळ आहे.
अग्नीचा गुणधर्मच आहे जाळुन खाक करणे मग तुम्ही प्रत्यक्ष जळुन खाक व्हा किंवा क्रोध, मत्सह, अहंकारानी जळुन जा. मात्र तो यापासून दूर राहातो त्याचे जीवन सार्थक होते.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर गोविंदराव**
मो. ९८२३११२९०७

यशवंत
धाराशिव जिल्हा
शुक्रवार दि. २० सप्टेंबर २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे ग्रामपंचायतीतही स्विकारणार फॉर्म

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – वय वर्षे ६५ व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सुसाहय जीवन जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणारे दिव्यांगत्व व अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्यासह व मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी आता लाभार्थ्यांचे ग्रामपंचायतीतही फॉर्म स्विकारण्यात येणार आहेत. पात्र लाभार्थ्यांनी फॉर्म करावेत असे आवाहन समाजकल्याणचे सहायक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

या योजनेतंर्गत ज्येष्ठ नागरिक यांचे वय दि.३१ डिसेंबर २०२३ पर्यंत ६५ वर्ष पुर्ण व लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लक्ष रुपयांच्या आत असणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि – ब्रेस, लंबर बेल्ट व सर्वाइकल कॉलर आदी साधने उपकरणे खरेदी करण्यासाठी एकवेळ एकरकमी ३ हजार रुपयांच्या मर्यादेत निधी वितरीत करण्यात येईल. त्यामुळे ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत ६५ वर्ष पुर्ण व लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयांच्या आत असलेल्या जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना जिल्हास्तरावर फॉर्म सादर करण्यासाठी अडचण निर्माण होत असल्याने लाभार्थ्यांना फॉर्म सादर करणे सोईचे व्हावे यासाठी पात्र लाभार्थ्यांनी संबंधित ग्रामपंचायत कार्यालयास फॉर्म सादर करावेत, असे आवाहन अरवत यांनी केले आहे.

# ग्रामीण भागाच्या विकासाचे काँग्रेसने लावलेले रोपटे भाजपा तोडण्याचे काम करतोय – माजी मंत्री मधुकरराव चव्हाण

## फडणविसांना आमचे घर फोडल्याचे पाप कधी ना कधी फेडावेच लागेल !




धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – मुख्यमंत्र्याच्या खुर्चीवर महानगरीय शहरातील राजकीय व्यक्ती बसून ग्रामीण भागातील समस्या जाणून घेऊ शकत नाही. याची जाणीव काँग्रेसचे नेते तथा माजी मुख्यमंत्री स्व यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती निर्माण करण्याचे स्वप्न उराशी बाळगून ते वास्तवात उतरविले. त्यामुळे छोट्याशा गावातील व्यक्ती मुख्यमंत्र्याच्या खुर्चीवर बसू लागली. त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील समस्या सुटल्याने ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास झाला व होत आहे. मात्र भारतीय जनता पार्टी हा पक्ष काँग्रेसने लावलेले ग्रामीण भागाच्या विकासाचे रोपटे तोडण्याचे काम करीत असल्याचा घणाघात केला. तसेच आमचे घर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोडले असून आम्हाला अस्वस्थ करून आमची बदनामी केली आहे. याचे दुःख आम्हाला असून तुम्हाला ते कधी ना कधी फेडावेच लागेल, अशा शब्दांत माजी राज्यमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी भाजपवर जबरदस्त हल्लाबोल केला. विशेष म्हणजे मी ९० वर्षांचा तरुण पुन्हा विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी तयार असून म्हातारा बैलच चांगली पेरणी करू शकतो, खोंडावर पेरणी व्यवस्थित होत नसल्याचे सांगत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यावरही दि.१८ सप्टेंबर रोजी निशाणा साधला.

धाराशिव तालुक्यातील येवती येथे काँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार, सुभाष हिंगमिरे, पंसचे माजी सभापती शिवाजी गायकवाड, रोहित पडवळ, लक्ष्मण सरडे, अशोक शिंदे, मुकुंद पाटील, सुरेश नाईकनवरे, गोविंद उंबरे, बळीराम उंबरे, भाऊ बारस्कर, अनिल वाकुरे, गोवर्धन भोसले, नंदकुमार क्षीरसागर आदी उपस्थित होते. पुढे बोलताना माजी मंत्री चव्हाण म्हणाले की, मी २२ व्या वर्षी राजकारणात आलो असून पूर्वी देखील हेवेदावे व गटबाजी होती. त्यावेळी विचारांची लढाई होती. मात्र आज घरात घुसून मारायचे प्रकार वाढले असूनही कुणाची संस्कृती आहे ? असा सवाल करीत त्यांनी थेट सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. मी १९८५ साली उस्मानाबाद विधानसभेची निवडणूक काँग्रेसच्या तिकिटावर डॉ पद्मसिंह पाटील यांच्या विरोधात उभा राहिलो. आम्ही कधी गुंडगिरी केली नाही. मात्र गुंडगिरीच्या विरोधात आम्ही ताकद वापरली. मात्र त्यावेळी माझा अवघ्या ४ हजार मतांनी पराभव झाल्याचे त्यांनी नमूद केले. तुळजापूर तालुक्याची ओळख दगड व कुसळी तालुका म्हणून होती आज ठिकठिकाणी तलाव बांधून पाणी अडविल्यामुळे संपूर्ण तालुका हिरवागार झाला आहे. गोरगरिबांच्या विकास कामाला पडणे हे काम मी सत्तेत असताना केले व आता देखील त्यांच्या मदतीला धावून जात असल्याचे त्यांनी सांगितले. मागच्या निवडणुकीत तुम्ही मला मतदान केले. मात्र पराभव झाल्याने तुमच्या मताचा अवमान झाला आहे तो अवमान भरून काढण्यासाठी पुन्हा मला निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले. माझ्या सत्तेच्या काळात विविध जाती धर्मातील २१ लोकांना पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद उपाध्यक्ष व सभापती केले. मात्र माझ्या घरच्या मुलांची भावना आमच्यासाठी काही केले नाही, अशी झाल्यामुळे त्यांनी गैरसमजुतीने भाजपात प्रवेश कोणत्या कारणासाठी दबाव टाकून करून घेतला याचा किस्साच सांगितला. तसेच राज्यातील अनेक घरांनी संपूर्ण सत्तेचे ऐश्वर्य भोगून फुटली व फोडली असल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेसने सत्तेत असताना सर्व समाजाची एकता ठेवण्याचे काम केले. मात्र भाजपने समाज फोडण्याचे व दंगे करण्याचे काम केले व करीत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. विशेष म्हणजे सत्ताधारी असलेल्या महायुतीला पुन्हा आपली सत्ता येणार नाही हे माहीत झाले आहे. तशी त्यांची खात्री देखील झाली असून त्यांना कळून ते चुकले आहे कोणत्याही परिस्थितीत ते पुन्हा सत्तेवर येऊ शकत नाहीत. त्यामुळे ते निवडणुका पुढे ढकलण्याचा अटहास करीत आहेत. मात्र निवडणुका या कोणत्याही परिस्थितीत होणार असून ही मंडळी राष्ट्रपती राजवट लावण्याचा मनस्थितीत असल्याचा गंभीर आरोप चव्हाण यांनी भाजप व मित्र पक्षांवर केला. यावेळी प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार यांनी देखील भाजपच्या धोरणावर सडकून टीका केली. यावेळी लक्ष्मण सरडे यांच्यासह इतरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार सुभाष हिंगमिरे यांनी मानले. यावेळी सुंभा, वाणेवाडी, हिंगळजवाडी, नितळी, येवती, टाकळी, इर्ला, दाऊतपूर, कोळेवाडी, रामवाडी, डकवाडी, राजुरी येथील माजी सरपंच विजय चव्हाण, उपसरपंच गोपाळ खांडेकर, जाफर शेख, उपसरपंच गोविंद उंबरे, सरपंच बाळासाहेब खांडेकर, बालाजी उबाळे, प्रकाश माळी, पोपट खांडेकर, सरपंच हमीद देशमुख, नबी शेख, फुलचंद कुचेकर, गोवर्धन भोसले, चेअरमन मोरे, रहीम मुलाणी, नंदकुमार क्षीरसागर, विष्णू चौरे, परमेश्वर नरटे, सोमनाथ खोत, रघुवीर राऊत, बाबा चौरे, हनुमंत हाजगुडे, लालासाहेब डक, बाळासाहेब मारवडकर, अकबर शेख, बाबा देडे यांच्यासह कोंड जिल्हा परिषद मतदार संघातील महिला, पुरुष व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ९० वर्षाचा तरुण निवडणुकीच्या मैदानात लढण्यासाठी तयार

### सरडेसह इतरांची पुन्हा घर वापसी

काँग्रेस पक्षामधून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केलेल्या लक्ष्मण सरडे, रोहित पडवळ, अशोक शिंदे, मुकुंद पाटील, पंचायत समितीचे माजी सदस्य अश्रुबा माळी यांच्यासह इतरांनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश करीत घर वापसी केली आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षामध्ये नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

## भारतीय बौद्ध महासभेच्या धाराशिव तालुकाध्यक्षपदी बनसोडे तर सरचिटणीसपदी वाघमारे



धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – भारतीय बौद्ध महासभेच्या धाराशिव तालुकाध्यक्षपदी बाबासाहेब बनसोडे यांची तर सरचिटणीस धनंजय वाघमारे यांची निवड करण्यात आली.

धाराशिव शहरातील स्मृती बुद्धविहार भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष राजश्री कदम यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये धाराशिव तालुका नूतन कार्यकारणीच्या निवडीसाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीत धाराशिव तालुका उर्वरित कार्यकारणीत कोषाध्यक्ष उमाजी गायकवाड, संस्कार उपाध्यक्ष आदिनाथ सरवदे, सचिव बाळासाहेब धावरे व संतोष कांबळे, पर्यटन उपाध्यक्ष स्वामीराव चंदनशिवे, सचिव बंडू बिडबाग व खंडेराया साळुंखे, महिला उपाध्यक्ष सिंधु लोंढे, सचिव रोहिणी बर्वे व मनोरमा काटे, हिशोब तपासणीस किरण धाकतोडे, संरक्षण उपाध्यक्ष बापू जावळे, सचिव नितीन लांडगे, सचिव कृष्णा ठवळे, तालुका संघटक बाबासाहेब घरबुडवे, गौतम हुंडे, रघुनाथ गायकवाड आप्पासाहेब कांबळे, शशिकांत सोनवणे, रणधीर कांबळे, धर्मराज कदम यांची निवड करण्यात आली. या बैठकीस भारतीय बौद्ध महासभा जिल्हा कोषाध्यक्ष कुमार ढेपे, संस्कार जिल्हा उपाध्यक्ष विजय बनसोडे, पर्यटन जिल्हा उपाध्यक्ष विश्वास पंडागळे, महिला जिल्हा उपाध्यक्ष शीलाताई चंदनशिवे, केंद्रीय शिक्षिका विजयमाला धावरे, बौद्धाचार्य गुणवंत सोनवणे, केंद्रीय शिक्षिका मीनाताई लागडे, पर्यटन सचिव बाबासाहेब जानराव आदींची उपस्थिती होती. जिल्हाध्यक्ष राजश्री कदम व जिल्हा पदाधिकारी यांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमांस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यानंद वाघमारे यांनी तर आभार बाबासाहेब बनसोडे यांनी मानले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साहित्यीक प्रा.डॉ. मनोहर यांच्या घरासमोर घोषणा देणाऱ्यांचा जाहीर निषेध

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – महाराष्ट्रातील आंबेडकरी विचारांचे थोर साहित्यीक, कवी प्रा. डॉ. यशवंत मनोहर यांच्या घरासमोरील निषेध करणाऱ्या मनुवादी प्रवृत्तींचा आंबेडकरी समुहाच्यावतीने जाहीर निषेध करुन मनोहर यांना संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे राज्यपालांकडे एका निवेदनाद्वारे दि.१८ सप्टेंबर रोजी केली आहे.



दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, दि. १७ सप्टेंबर रोजी काही अपप्रवृत्तींनी महाराष्ट्रातील आंबेडकरी विचारांचे थोर साहित्यीक, कवी प्रा.डॉ. यशवंत मनोहर यांच्या घरासमोर निषेध करण्याचा प्रयत्न केला. प्रा.डॉ. मनोहर यांना काँग्रेस धार्जीने दाखविण्याचा खोडसळ प्रचार करण्याचा अयशस्वी प्रयत्न काही मनुवादी लोक करीत आहेत. ज्या व्यक्तीने आपली संपूर्ण हयातच आंबेडकरी विचारांची अगदी सखोल मांडणी करण्यासाठी घालविली आहे. तर त्यांनी सातत्याने संविधानीक मुल्यांची जपनूक व्हावी या खास उद्देशाने आपली भूमिका मांडली आहे. विचारवंतांनी आपली भूमिका केवळ पुस्तकांतूनच न मांडता जाहीर देखील केली पाहीजे, तरच खऱ्या अर्थाने त्यांच्या विद्वत्तेचा उपयोग समाजाला पर्यायी देशाच्या अखंडतेला होऊ शकेल. तसेच प्रा. डॉ. मनोहर यांच्या घरासमोर निषेध आंदोलन करणाऱ्या अपप्रवृत्तींच्या विरुध्द आंबेडकरवादी विचारांचे लोक आणखी ताकतीने मनोहर यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून अशा अपप्रवृत्तींना जाहिर निषेध केला. त्यामुळे त्यांना शासशाने संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी केली आहे. यावेळी कैलास शिंदे, विशाल शिंगाडे, पृथ्वीराज चिलवंत, रणजीत गायकवाड, दादासाहेब जेटीथोर, अशोक बनसोडे, प्रवीण बनसोडे, व्ही.एस. गायकवाड, संग्राम बनसोडे, अमित बनसोडे, प्रा डॉ महादेव गायकवाड, प्रमोद हावळे, संदिपान कांबळे, अरविंद वाळके, संग्राम बनसोडे, संदीप बनसोडे, हरिभाऊ बनसोडे, संदीप अंकुशराव, सुनील बनसोडे, दीपक सरवदे, मिलिंद डावरे, विक्रम कांबळे, सुशांत बनसोडे, करण वाघमारे, सोमनाथ गायकवाड, शितल वाघमारे, राजाभाऊ जानराव आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या मान्य करून त्यांचे उपोषण स्थगित करा

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासह इतर मागणीसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दि.१७ सप्टेंबरपासून आमरन उपोषण सुरू केले आहे. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावत चालली असून त्याचा गांभीर्याने विचार करून शासनाने त्यांच्या सर्व मागण्या तात्काळ मान्य करून त्यांचे उपोषण स्थगित करण्यात यावे. अन्यथा जिल्ह्यामध्ये तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सकल मराठा समाजाच्यावतीने एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना दि.१८ सप्टेंबर रोजी दिला आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, सगे सोयरे जीआरची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. हैद्राबाद गॅजेट लागू करण्यात यावे, सातारा गॅजेट लागू करण्यात यावे, बॉम्बे गव्हर्नमेंट गॅजेट लागू करण्यात यावी, मराठा बांधवावर झालेले गुन्हे मागे घेण्यात यावेत. अन्यथा धाराशिव जिल्ह्यामध्ये सकल मराठा समाजाच्यावतीने बेमुदत स्वरूपाचे तीव्र आंदोलन करण्यात येईल याची शासनाने नोंद घ्यावी. या आंदोलनामुळे होणाऱ्या परिणामास शासन जबाबदार राहील असा इशारा दिला आहे. यावेळी बलराज रणदिवे, रोहीत पडवळ, अभिजीत सुर्यवंशी, अमोल जाधव, अक्षय नाईकवाडी, मुकुंद घाटगे व आकाश मुंडे आदी उपस्थित होते.

## महिला भगिनींचा अवमान करणाऱ्या आमदार सुनील केदार यांच्यावर कारवाई करावी – साळुंके

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आमदार सुनील केदार यांनी मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजनेला विरोध दर्शविला असून आमची सत्ता आल्यास ही योजना बंद करू अशी घोषणा केली आहे. त्यामुळे महिलांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून केदार यांच्या भूमिकेसह काँग्रेसवर विरोधकांनी टीकेची जोड उठवली असून महिलांचा अवमान करणाऱ्या आ केदार यांच्यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी मुख्यमंत्र्याकडे प्रत्यक्ष भेटून केली आहे. दरम्यान, काँग्रेस पक्ष याबाबत काय कारवाई करणार व भूमिका घेणार याकडे महिलांच्या नजरा खिळल्या आहेत.

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे यासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी जवळपास दीड कोटी महिलांनी नोंदणी केली असून ऑगस्ट व सप्टेंबर या २ महिन्यांचे ३ हजार रुपये प्रमाणे रक्कम देखील संबंधित महिलांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे. मात्र आ सुनील केदार यांचे निकटवर्तीय असलेले अनिल वडपल्लीवार यांनी नागपूर खंडपीठात मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजनेचा आर्थिक भार सोसण्याची राज्याची स्थिती नाही. त्यामुळे राज्याचा खजिना रिकामा होत असून आर्थिक स्थिती खराब होत असल्याचे कारण सांगत ती योजना बंद करण्याचा न्यायालयाने निर्णय द्यावा अशी याचिकेद्वारे मागणी केली आहे. तर आ. केदार यांनी ही योजना आमचे सरकार आल्यास बंद करू अशी वल्गना केली आहे. यावरुन महिलांचे होणारे आर्थिक सक्षमीकरण काँग्रेस व त्यांच्या नेत्यांच्या डोळ्यात खूपच असल्याचे सिद्ध होत आहे. विशेष म्हणजे कथित उस्मानाबाद व नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्जरोखे गैरव्यवहार प्रकरणी आ. केदार यांनी काय कारनामे केले ? हे अख्या देशाने पाहिले असल्याचा खरमरीत टोलाही जिल्हाप्रमुख साळुंके यांनी लगावला आहे. तसेच स्वतःचे आर्थिक सक्षमीकरण



करणाऱ्या केदारांना सरकारने महिलांचे केले जाणारे व होत असलेले सक्षमीकरण पहावत नसल्यामुळे त्यांचा पोटसूळ उठला असल्याची टीकाही त्यांनी केली आहे. त्यामुळे अशा वल्गणेबाज व महिलांचा अवमान करणाऱ्या आ केदार यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी साळुंके यांनी केली आहे

## उद्या प्रधानमंत्री मोदींच्या हस्ते आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्धाटन

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ युवक युवतींना व्हावा,या दृष्टीकोनातून राज्यामधील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेच्या धर्तीवर राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य केंद्राची स्थापना करण्यात येत आहे. जिल्ह्यातील १५ महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात येणाऱ्या या केंद्राचे ऑनलाईन उद्धाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि.२० सप्टेंबर रोजी ऑनलाईन वर्च्यूअल पध्दतीने उद्धाटन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी दिली.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार व कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. धाराशिव येथील रामकृष्ण परमहंस कॉलेज,तेरणा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,मदर कांचन कॉलेज, सहयाद्री नर्सिंग कॉलेज,राजर्षी शाहू कॉलेज ऑफ सायन्स,तुळजाभवानी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग तुळजापूर,श्रीकृष्ण कॉलेज गुंजोटी, तात्याराव मोरे कॉलेज ऑफ फार्मसी उमरगा, भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालय बलसुर, श्री स्वामी समर्थ आर्टस कॉलेज रूईभर, छत्रपती संभाजीराजे ज्युनिअर कॉलेज बेंबळी,शिक्षण महर्षी आर.जी. शिंदे महाविद्यालय परंडा, साई कॉलेज ऑफ कॉम्प्युटर कॉलेज रांजणी, हभप सोपानकाका केळे आयटीआय कॉलेज वाशी, विद्या निकेतन ज्युनिअर कॉलेज येरमाळा या १५ महाविद्यालयांची जिल्ह्यातून निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे यांनी यासंदर्भात सर्व उपायुक्त,सहाय्यक आयुक्त आणि प्राचार्यांना पत्र पाठविले आहे.आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजनेचे उद्धाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. प्रत्येक केंद्रामध्ये आवश्यक बाबींची पुर्तता करून महाविद्यालय कौशल्य विकास केंद्र प्रशिक्षण प्रदाता यांच्यासोबत समन्वय साधून हा उद्धाटन कार्यक्रम होणार आहे. महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास प्रशिक्षण मोफत देण्यात येणार असून,त्यासाठी जास्तीत जास्त उमेदवारांनी नोंदणी करुन योजनेचा लाभ घ्यावा. तसेच २० सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमाला संबंधित महाविद्यालयात जास्तीत जास्त उमेदवारांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. ओंबासे यांनी केले आहे.



# एमआयटी यशवंतराव चव्हाण रुग्णालयात मातृवंदन सेवा मोफत योजनेचा शुभारंभ

लातूर दि. १६ - लातूर येथील एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात त्यागमूर्ती प्रयागाआक्का कराड मातृवंदन सेवा योजना नव्याने सुरू करण्यात आली असून या योजनेचा शुभारंभ लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने करण्यात आला. सदरील योजनेमुळे महिला प्रसुती व त्यासंबंधीच्या शस्त्रक्रिया मोफत होणार आहेत.

ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्य निरोगी असावे यासाठी सातत्याने लातूर एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड मातृवंदन सेवा ही योजना नव्याने सुरू केली असून या योजनेच्या माध्यमातून महिलांच्या प्रसुती आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड मातृवंदन सेवा योजनेचा शुभारंभ रविवारी एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठता डॉ. बस्वराज नागोबा, प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, रुग्णालय अधीक्षक डॉ. माले, स्त्रीरोग विभाग प्रमुख प्रा. डॉ. क्रांती केंद्रे, प्रा. डॉ. चंद्रकला डावळे, डॉ. लिला खटोड, डॉ. रोशनी आकूसकर, डॉ. प्रिती, डॉ. आबेद नागुरे, डॉ. माहे दरक्षण, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, श्रीपती मुंडे, श्री. हत्ते यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रसुती विभाग आणि स्त्री रोग विभागाची परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले व महिला रुग्णांच्या सुविधेबाबत महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

# दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगावचे संयुक्त ध्वजारोहण संपन्न

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव संस्थेअंतर्गत चालणाऱ्या विविध विद्याशाखांच्या वतीने संस्थेच्या क्रीडांगणावर मराठवाडा मुक्ती संग्राम आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनाच्या निमित्ताने संयुक्त ध्वजारोहण प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ध्वजारोहण संचालक गोविंद देशमुख, दयानंद विद्यालय संस्थेचे इमामसाहेब मुजावर तर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे ध्वजारोहण केंद्रप्रमुख स्वामी मॅडम यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेचे विद्यमान उपाध्यक्ष नरसिंह देशमुख, सचिव शाम देशमुख, संचालक भीमराव शिंदे, सुवर्णाताई मुळे, उपसरपंच गोविंद देशमुख यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने आरती मुक्तापुरे, प्रांजळ भाडूळे, श्रेया भाडूळे, रिद्धी करणवाड, धनश्री भंडे यांनी आपली मनोगत व्यक्त केली. ध्वजारोहण कार्यक्रम कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, आर.डी. गायकवाड, मुख्याध्यापक माने मॅडम, शेख सर, प्राचार्य पठाण मॅडम, क्रिडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, स्टाफ सचिव डॉ. जयदेवी पवार, प्रा. विवेक कदम, प्रा. हरिहर गायके यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख अंगद कोते, डॉ. माना गायकवाड, आयरेकर पी.एस. राठोड, अंकुश थ, बालाजी देशमुख, नितीन पाटील यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दशरथ भिसे यांनी केले. शेवटी सर्वांचे आभार डॉ. नाना जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला , मुख्याध्यापक,प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाचशेघर मठात दि. १९ सप्टेंबर २४ ते ३० सप्टेंबर २४ दरम्यान श्री मन्मथ स्वामी सप्ताहाचे आयोजन

लातूर / प्रतिनिधी- येथील आझाद चौक परिसरातील श्री पाचशे घर मठामध्ये प्रतिवर्षाप्रमाणे श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामींच्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री मन्मथ स्वामी सप्ताहाचा शुभारंभ दि. १९ सप्टेंबर २०२४ वार गुरुवार रोजी रात्री ११.०५ वा . होऊन टाळ,आरती दि. २६ सप्टेंबर २०२४ वार गुरुवार रोजी रात्री ११:५५ वा. होणार आहे. दि. ३० सप्टेंबर २०२४ वार सोमवार सकाळी ६.३० वा. श्री ची पालखी मिरवणूक पारंपारिक मार्गाने निघून सायंकाळी ६.०० वा. श्री पाचशे घर मठामध्ये आरती व प्रसादाने सांगता होईल. श्री सप्ताह कालावधीत विविध धार्मिक, सामाजिक, रुद्रपठन, प्रवचन, भजन, संगीत भजन, किर्तन, भारुड वगैरे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री पाचशेघर मठ संस्थानच्या वतीने विश्वस्त मंडळ, श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी सप्ताह समिती, पुरुष व महिला भजनी मंडळ, भक्त व अनुयायी यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# माऊली विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात संपन्न



लातूर / प्रतिनिधी- माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण प्रमुख पाहुणे मा. सुलोचना बाहेती नोगजा मॅडम यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत विद्यालयाच्या प्राचार्या सौ. आरडले मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था सचिव श्री गंगाधर आरडले सर केले. याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष श्री तानाजी बेवनाळे पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये विद्यालयातील बालवाडी ते दहावीपर्यंतच्या सर्व गटातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ऐतिहासिक प्रकल्प प्रदर्शन होते. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट असे प्रकल्प तयार केले.यात निजाम कालीन दुर्मिळ फोटोंचा संग्रह,ऑपरेशन पोलो, जुनी गोलाई, असे उपक्रम तयार केले. सर्व पालक आणि पाहुण्यांनी या प्रदर्शनाचे कौतुक केले. तसेच इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा २०२३ २४ मधील गुणवंतांचा सत्कार ही करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मोमेंटो देण्यात आले. तसेच विद्यालयातील पडिले अजिंक्य पंढरीनाथ, प्रजापती किंजल पुष्कर या विद्यार्थ्यांना माऊली भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कलाशिक्षिका उबाळे मॅडम यांनी तर आभार उपप्रचार्या काळे मॅडम यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता विसर्जनाचे औचित्य साधून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते माऊलीच्या श्री गणेशाची आरती व महाप्रसाद वाटपाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी व्यवस्थापक श्री गोपाळ करडिले, संपूर्ण शिक्षक वृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# देशाला एकसूत्रात गुंफणारी भाषा हिंदी :प्रा. आर.व्ही. विभुते

चाकूर / प्रतिनिधी- येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयात हिंदी विभागाच्यावतीने १४ सप्टेंबर हिंदी दिवस व हिंदी साहित्य मंडळांचे उद्घाटन हिंदी विभागाध्यक्ष प्रा. विभुते आर . व्ही . , प्रा. सौ मानखेडकर बी.एस., प्रा. सौ. धनुरे पल्लवी , साहित्य मंडळ अध्यक्षा कु. बागवान , सहसचिव रजत भोळे यांच्या उपस्थितित संत कबीर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून संपन्न झाला.

या प्रसंगी प्रा. विभुते म्हणाले हिंदी ही आज विश्वासाची तिसरी महत्वपूर्ण भाषा असुन , भारताला एकसुत्रात गुंफण्याची क्षमता हिंदी भाषेत आहे . आज हिंदी रोजगाराची भाषा बनली असुन विद्यार्थांनी हिंदी साहित्य व रोजगारभिमुख हिंदी च्या संधी पाहुन हिंदी भाषेचे ज्ञान आत्मसात केले पाहिजे असे विचार मांडले .

प्रा. बबिता मानखेडकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले , या प्रसंगी साहित्य मंडळाच्या पदाधिकारी कु. रीतिका पाटील , वाघमारे करीना , केंद्रे रेश्मा , अक्षता गंदगे , दत्ता कांबळे यांचा गुलाब पुष्प देऊन व पोष्टर प्रदर्शन मध्ये प्रथम कु. बागवान शबापी , द्वितीय पठाण समीर यांचा प्रमाणपत्र व ग्रंथ भेंट देऊन सत्कार करण्यात आला . बी.ए. तृतीय वर्षाचा विद्यार्थी दापकेवाले सोहेल याची रायगड येथे पोलीस भरती झाल्या बद्दल सन्मानित करण्यात आले. बागवान शपाबी ने हिंदी दिवसाचे महत्व या विषयावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. पल्लवी धनुरे यांनी व्यक्त केले .

# दयानंद शिक्षण संस्थेत ७६ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

लातूर / प्रतिनिधी- दयानंद शिक्षण संस्था संचलित सर्व महाविद्यालयाच्या वतीने विज्ञान महाविद्यालयाच्या समोरील प्रांगणात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा ३० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या हस्ते मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले तर विद्यापीठ वर्धापन दिन ध्वजारोहण संस्थेचे सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्या हस्ते करण्यात आले.



या ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी ज्यांनी महाविद्यालय व शिक्षण संस्थेच्या नावलौकिकात भर टाकली अशा उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा सन्मान दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी यांनी केला. यामध्ये दयानंद कला महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक पदी नियुक्ती झाल्यामुळे डॉ. प्रशांत दीक्षित यांचा तसेच डॉ. आकांक्षा भांजी व डॉ.लक्ष्मीकांत सोनी (पेटेंट कार्यालय, भारत सरकार द्वारे Financial Crisis Management Device Mo Design Patent प्राप्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय छात्र सेनेच्या पथसंचलनाचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी दयानंद कला महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत सादर करण्यात आले.

या प्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव मा.श्री रमेश बियाणी, नियामक मंडळ सदस्य श्री. विशाल लाहोटी, श्री. कुणाल कोरे व श्री.अशोक पाटील तसेच दयानंद शिक्षण संस्था संचलित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, एन.सी.सी. कॅडेट, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ध्वजारोहण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिनेश जोशी यांनी केले.

# मनपाच्या पिण्याच्या पाण्याच्या नळाला आल्या लहानशा पांढ-या जीवंत आळ्या

## महिला वर्गात पसरली भीती व घबराट

लातूर, दि.१९, शहर महानगर पालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या नळातून, आज १९ सप्टेबर रोजी विवेकानंद चौक परिसरात सकाळी ९ च्या सुमारास, चक्क लहान - लहान व लाबंट अशा पांढ-या आळ्या मोठ्या प्रमाणात आल्याने, महिला वर्गात सर्वत्र भिती आणि घबराट पसरली आहे.



महानगर पालिकेच्या घरगुती पिण्याच्या पाण्याच्या नळाला नेहमीप्रमाणे, आज गुरुवारी विवेकानंद चौक व मातोश्री रमाई नगरमध्ये सकाळी पाणी सुटले होते. महिला वर्गाने प्रारंभीचे थोडे पाणी सांडावांडी करिता म्हणून घेतले. तसेचे नित्य पिण्यासाठी म्हणून, पातळ दुहेरी सुती कपड्याने गाळून घेतले. आणि मग साठवणीसाठी म्हणून स्वच्छ केलेल्या भांडी व टाक्यामध्ये पाणी घेत असताना, हा प्रकार कांही महिलांच्या लक्षात आला. नळातून आलेल्या पाण्यावर पांढ-या रंगाच्या, कांही २-३ से. मी. च्या तर कांही ४-५ से.मी. लांबीच्या आणि हात शिलाईच्या लहान सुईच्या अर्ध्यापेक्षा अधिक जाड अकाराच्या असाव्यात. शिवाय त्या पाण्याखाली थरात न राहता वा जाता, त्या अगदी वरतीच तरंगत होत्या. यापूर्वी शनिवार १४ सप्टेंबर रोजी सोडण्यात आलेल्या, पाण्यात सुद्धा अगदी असाच प्रकार निदर्शनास आला होता. मात्र यदा-कदाचित कांहीसी एखाद घटना असावी म्हणून, महिलांनी त्याकडे दुर्लक्ष केले होते. परंतु परत पुढे ५ दिवसांनी पण तोच प्रकार झालेला दिसून आला. त्यामुळे महिलानी संताप व्यक्त केला आहे. आणि लातूर महानगर पालिका प्रशासनाने, यात तातडीने लक्ष घालून चौकशी करावी. आणि याचा अंतिम शोध घेऊन योग्य प्रतिबंध करावा, अशी जाहीर मागणी सुंदरताई कांबळे, मधुश्री शिंदे, सूर्या रायवाडीकर व सोनाली भारती आदी महिलांनी केली आहे.

# मराठवाड्याला न्याय देण्यासाठी एक लाख कोटीचा अनुशेष भरून काढण्याची गरज - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर / प्रतिनिधी- हैदराबादमध्ये निजाम सरकार होते. त्यामध्ये कर्नाटकातील तीन जिल्हे तेलंगणातील १८ व मराठवाड्यातील ८ जिल्ह्याचा समावेश होता. मराठवाड्यावरती निजामांनी २२५ वर्षे राज्य केले. १९३८ ते १९४८ या कालावधीत स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगांबर बिंदू, भाऊसाहेब वंशपायन, देविसिंह चव्हाण, बाबासाहेब परांजपे, शंकरसिंह नाईक व सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासह आर्यसमाजी लोकांनी मराठवाडा मुक्तीसंग्रामासाठी लढा देऊन १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याला स्वातंत्र्य झाला. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या व विकासासाठी निधी देऊ असे आश्वासन दिले होते. परंतु त्या प्रमाणात मात्र मराठवाड्याचा विकास झालेला नाही. परिणामी अद्यापही एक लाख कोटीचा अनुशेष रखडला असल्याचे समोर आलेले आहे. लातूर शहरातून दरवर्षी हजारो डॉक्टर्स, इंजिनिअर्स घडतात. आय.आय.टी.व आय.आय.एम. ला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे यापुढील कालावधीत तरी मराठवाड्याला न्याय देण्यासाठी शासनाने रखडलेला एक लाख कोटीचा अनुशेष भरून काढण्याची गरज निर्माण झालेली आहे, असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी कैले.

यावेळी ते जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंदपूरम् शैक्षणिक संकुल एमआयडीसी लातूर येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जेएसपीएमचे संचालक निळकंठराव पवार, शिवराम बारबोले, जेएसपीएम संस्थेचे समन्वयक विनोद जाधव, फायनांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, समन्वयक शैलेश कचरे, प्राचार्य संदीप पांचाळ, प्राचार्य विकास लबडे, प्राचार्य बोंडगे, शिवाजीराव पाटील कव्हेकर कॉलेज ऑफ फार्मसीचे समन्वयक ओमराजे पवार, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, प्राचार्य शिरीन मॅडम,प्राचार्य लक्ष्मीकांत गौंड, संजय बिरादार, प्र.प्राचार्य रोहित येरटे, सचिन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, मराठवाड्याला न्याय देण्यासाठी घटनेच्या ३७१(२) मध्ये दुरूस्ती करून वैधानिक विकास महामंडळ निर्माण करण्याची तरतूद करण्यात आली आणि १ मे १९९४ ला वैधानिक विकास मंडळाची स्थापना गोविंदभाई श्रॉफ व मा.पी.व्ही.नरसिंगराव यांच्या पुढाकारातून करण्यात आली. परंतु त्यावेळी ४ हजार कोटीवर असलेला अनुशेष आज एक लाख कोटीवर गेलेला आहे. हा अनुशेष भरून काढण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. कृष्णा, मराठवाडा प्रकल्पाची घोषणा करून उजनी धरणातून ६० टीएमसी पाण्यापैकी २४ टीएमसी पाणी देण्याचे मान्य करण्यात आले. त्याचे भूमिपूजन तत्कालीन मुख्यमंत्री कै. विलासरावजी देशमुख यांच्याहस्ते करण्यात आले. परंतु त्यातील एक थेंबही पाणी आणता आलेले नाही. त्यामुळे राज्य शासनाने ते हक्काचे पाणी मिळवून द्यावे. मराठवाडा वॉटर ग्रिड योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. याबरोबरच मराठवाड्यातील शिक्षण, उद्योग व इतर रखडलेला अनुशेष सरकारने भरून काढावा अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेल, स्वामी रामानंद तीर्थ,भारत माता व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून व ध्वजारोहन करून मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी या महात्म्यांना भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद आयटीआय व ज्युदो स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मारुती सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अब्दूल गालिब शेख यांनी केले तर प्राचार्य गोविंद शिंदे यांनी आभार मानले.




## मोदीजींच्या नेतृत्वाखाली भारत जगाचे नेतृत्व करेल

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली अनेक विधायक निर्णय घेण्यात आले. शेतकरी सन्मान योजना, आयुष्यमान भारत योजना अशा अनेक योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्याला न्याय देण्याचे काम मोदीजींनी केले. ३७० कलम रद्द करणे, तीन तलाकची पध्दत बंद करणे, राम मंदिराची उभारणीसह देशहिताचे अनेक निर्णय मोदीजींनी घेतलेले आहे. मोदीजींच्या दैदिप्यमान कार्यामुळे जगभरात भारताचा गौरव वाढलेला आहे. त्यामुळे १८ व्या शतकात स्वामी विवेकानंदांनी केलेली भविष्यवाणी खरी ठरून २१ व्या शतकामध्ये पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्त्वाखाली भारत एक विश्वगुरू बनून जगाचे नेतृत्त्व करेल असा विश्वासही भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

## मराठवाडा मुक्तीसंग्रामामुळे भारत स्वतंत्र झाला - प्राचार्य मारुती सूर्यवंशी

मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा इतिहास हा अतिशय ज्वलंत आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याइतकाच मराठवाडा मुक्तीसंग्रामही महत्त्वपूर्ण आहे. मुक्तीसंग्रामामुळे हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून मुक्त झाल्याने भारतीय स्वातंत्र्याला पूर्णत्व मिळाले. आर्य समाजाने या लढ्यामध्ये अतिशय मोलाची भूमिका बजावली. या लढ्यात, आंदोलनात मोठ्या प्रमाणात आर्य समाजातील लोकांना तुरूंगवास झाला. अनेकांनी मराठवाडा मुक्तीसंग्रामासाठी बलिदान देत निजामाची राजवट उलथून टाकत २२५ वर्षाच्या गुलामगिरीतून मराठवाडा मुक्त झाला आणि मराठवाडा मुक्तीसंग्रामामुळेच भारत देश स्वतंत्र झाला असे प्रतिपादन प्राचार्य मारुती सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकामध्ये व्यक्त केले.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# लोकशाही मार्गाने ठरणार व्हॉईस ऑफ मीडियाचे महाराष्ट्राचे शिलेदार

## प्रदेशाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सरचिटणीस, उपाध्यक्ष व ६ विभागीय अध्यक्ष यांची होणार निवड

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी) – देशभरासह जगातील ४३ देशांमध्ये संघटन असलेल्या सर्वात मोठ्या या संघटनेची महाराष्ट्राची कार्यकारिणी लोकशाही पद्धतीने २२ सप्टेंबरला ठरणार आहे. ऑनलाईन पद्धतीने राज्यभरातील पत्रकारांना या निवडणुकीच्या माध्यमातून योग्य नेतृत्वाला पसंती देण्याची या निमित्ताने ऑनलाईन संधी मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्य पदाधिकारी निवडणूक कार्यक्रम २०२४–२५ साठी व्हॉईस ऑफ मीडियाच्या महाराष्ट्र राज्य पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या लोकशाही मार्गाने म्हणजेच निवडणुकीतून पूर्ण होणार आहेत.

प्रदेशाध्यक्ष, ३ कार्याध्यक्ष, सरचिटणीस, उपाध्यक्ष, ६ विभागीय अध्यक्ष आदी पदांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

१३ ते १५ या दरम्यान संघटनेत २ वर्ष चांगले काम करणाऱ्या आणि उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या इच्छुक उमेदवारा कडून अर्ज मागवण्यात येत आहेत. आलेल्या अर्जाची छाननी होईल. त्या अर्जातून १३ उमेदवार आपले नशीब आजमावतील. अनुक्रमे एक नंबरचे मतदान ज्या पदाधिकारी यांना होईल त्याला त्या प्रमाणे पद देण्यात येईल. दि.२१ सप्टेंबरपर्यंत प्रचारासाठी दहा दिवसांचा वेळ मिळेल.

दि.२२ सप्टेंबर ला मतदान होईल. निवडणुकीचा निकाल दि.२३ सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येईल. सर्व पदाधिकाऱ्यांचा दि.२९ सप्टेंबर रोजी पदग्रहण व सत्कार होईल. या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ड.संजीवकुमार कलकोरी व सी.ए. सुरेश शेळके हे काम पाहतील. त्यांचा निर्णय अंतीम निर्णय असेल.

### अशी असेल मतदान प्रक्रिया

मतदान हे ई–मेलद्वारे होणार आहे. मतदान करण्याचा अधिकार राज्यकार्यकारणी पदाधिकारी, सदस्य, जिल्हाध्यक्ष, जिल्हा कार्याध्यक्ष, महानगर अध्यक्ष, जिल्हा सचिव, तालुका अध्यक्ष, यांना असेल. स्वतः च्या मेल आयडी वरून खालील प्रमाणे आपण मतदान करायचे आहे. विषयामध्ये : राज्य पदाधिकारी निवडणूक कार्यक्रम २०२४ माझे मतदान असे लिहायचे आहे. त्यानंतर मुख्य मेसेजमध्ये स्वतः चे नाव, जिल्ह्याचे नाव, व्हॉईस ऑफ मीडिया मधील पद, मोबाईल नंबर माझे मतदान.... यांना आहे. असा मजकूर लिहून सदर मेल vommaharashtragmail.com या मेल आयडीवर दि.२२ रोजी सकाळी ९ ते रात्री ७ या वेळेमध्येच पाठवायचा आहे.

# रुक्मीनी बाईंचे लिंबू सरबत देऊन आमरण उपोषण सोडले

अहमदपूर :– मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी न्यायासाठी अदिवासी, ८५ वर्ष वयाच्या वयोवृद्ध, विधवा महिला रूक्मीणबाई महादू कार्लेवाड रा. गुंजोटी यांचे तहसीलदार अहमदपूर यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू झाले होते, मात्र दुसऱ्या दिवशी तहसीलदार पांगरकर मॅडम यांनी संबंधित प्रश्नाबाबत लोकाधिकार संघाचे लोकाधिकारप्रमुख व्यंकटराव पनाळे व अन्य पदाधिकारी यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन देऊन आमरण उपोषणास बसलेल्या रुक्मीनबाई यांना तहसीलदार पांगरकर मॅडम यांनी लिंबू सरबत देऊन उपोषण सोडले.



यानंतर नायब तहसीलदार मधुकर क्षीरसागर, लोकाधिकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस शंकरराव शेळके, लोकाधिकार संघाचे लातूर जिल्हा उपप्रमुख लिंबाजी हजारे, लोकाधिकार संघाचे अहमदपूर तालुकाप्रमुख विठ्ठलराव तरडे, लोकाधिकार संघाचे अहमदपूर शहर प्रमुख प्राचार्य अशोकराव पेद्देवाड, हनुमंत अंगद मामीलवाड, नांदेड संस्थापक अध्यक्ष, आदिवासी कोळी महादेव सामाजिक संघटना, लक्ष्मण पेठकर चापोली, गजानन चांदेवाड सरपंच रूद्धा, पांडुरंग धडे सरपंच जढाळा, धोंडीराम रद्देवाड परचंडा, हरिभक्त परायण नवनाथ महाराज भानगिरे, किशोर काळवणे, दयानंद ईगे, संतोष बुजारे, जनार्दन गायकवाड, ओमकार गंगथडे उन्नी, चंद्रकांत कोलपुसे साळंकवाडी, सौ आयोध्याताई भोपळे उजळंब, सौ. रंजनाताई चंद्रकांत कोलपुसे, सौ. अंजनाताई नवनाथ भानगिरे आदी उपस्थित होते. आमरण उपोषणाच्या पहिल्याच दिवशी अहमदपूरचे माजी आमदार विनायकराव पाटील यांनी उपोषण स्थळी येऊन रूक्मीणबाई महादू कार्लेवाड यांना भेट दिली होती. तसेच अनेक मान्यवरांनी उपोषण स्थळी भेट देऊन उपोषणास पाठिंबा दिला होता.

# शिवसेनेचे राज्यव्यापी आंदोलनाचे पडसाद लातूरात

## काँग्रेस नेते सुनील केदार यांच्या प्रतिमेला गांधी चौक येथे जोडो मारो आंदोलन

लातूर :– शिवसेनेचे राज्यव्यापी आंदोलनाचे पडसाद लातूरातही उमटले असून काँग्रेस नेते सुनील केदार यांच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद करण्याच्या वक्तव्यावर लातूर शिवसेना महिला आघाडीचे राज्यव्यापी आंदोलन महिला आघाडीकडून करण्यात आले. मा. खासदार श्रीकांत शिंदे साहेब, शिवसेनेचे राज्य सचिव श्री.संजयजी मोरे साहेब,मराठवाडा विभागीय संपर्क प्रमुख श्री आनंदराव जाधव साहेब, लोकसभा प्रमुख श्री बालाजीराव काकडे साहेब, जिल्हा संपर्क प्रमुख अँड बळवंत भाऊ जाधव साहेब, जिल्हा महिला संपर्क प्रमुख सौ. रंजना ताई कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले.



काँग्रेसचे राहुल गांधी, सुनील केदार यांच्या प्रतिमेला जोडे मारुन सुनील केदार यांचे नागपूर घोटाळ्यातील भ्रष्टाचारे कारनामे सांगत सुनील केदार यांच्या फोटोला काळं फासले यातच आरक्षण संपवू अशी भाषा करणाऱ्या राहुल गांधी यांचा निषेध करुन त्यांच्या प्रतिमेला काळं फासले अशा प्रकारचे आंदोलन काँग्रेस आणि सुनील केदार यांच्याविरोधात गुरुवार सकाळी दि. ११.३० वाजता शिवसेना महिला आघाडीकडून निषेध आंदोलन गांधी चौक लातूर येथे करण्यात आले.

यावेळी निषेध बॅनरवर काँग्रेस लाडक्या बहिणींचा सावत्र भाऊ ,आमचे पैसे नका खाऊ ,सुनील केदारचे करायचे काय , खाली डोकं वर पाय , लाडक्या बाहिणींचा दुष्ट भाऊ , केदार तुला आम्ही निवडणुकीत पाडू , बँक घोटाळ्याचा आरोपी लाडक्या बहिणींची केदारला पोटदुखी मिळून साऱ्या बहिणी ,काँग्रेसला पाजू पाणी अशा प्रकारच्या घोषणा यावेळी शिवसेना पदाधिकार्याच्या वतीने देण्यात आल्या.

यावेळी जिल्हाप्रमुख कल्पनाताई बावगे , शहर प्रमुख परवेजभाई पठाण , उपशहर प्रमुख विजयकुमार कांबळे , तालुका प्रमुख तथा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जिल्हा सदस्य सदाशिव गव्हाणे , माजी उपजिल्हा प्रमुख विष्णू साबदे,युवा सेना जिल्हा प्रमुख कुलदिप सुर्यवंशी ,युवा सेना उपजिल्हा प्रमुख कृष्णा सरवदे , युवा सेना जिल्हा सचिव गणेश पवार , तालुका संघटक बाळू दंडीमे ,बचतगट जिल्हा प्रमुख सौ वर्षा धडे , सौ शिवनंदा दानाई ,शाखा संघटक सौ. संगीता शेटे , उपशहर प्रमुख सौ.शिलवंत ताई , शिवसेना महिला जिल्हा प्रमुख लातूर ग्रामीण प्रतिताई कोळी ,उपजिल्हा प्रमुख उर्मिला भगत, सुरेखा गाडेकर,लातूर ग्रामीण युवती जिल्हा प्रमुख अर्चना जाधव ,मागासवर्गीय जिल्हा प्रमुख शिवचैतन्य पाटील ,वनिता गोरे , अल्पना वाघमारे ,गट प्रमुख श्रीमती सुरेखा बिडवे, विमल शेटे, अनिता कमलापुरे , किरण नंदगवळी , अरुणा गुणगुणे , सपना शेंडगे , मुंडे ताई, लक्ष्मी पवार, राजश्री बिराजदार , रूपाली तांदळे , सप्रिया कासूले, दिपा स्वामी , मीना येणगे , सुरेखा स्वामी , मीना यमले ,रंजना कासले , महादेवी दानाई , रूपा स्वामी , चंदा काडोदे ,सरूबाई काळगे , मीरा दामा , कमल दामा , ज्ञानदनी बिराजदार, बडगिरे ताई,काशीबाई येमले , ज्योती नंदगवळी ,सुरेखा झुंजारे ,आरती पवार, सरिका नंदगवळी , पुष्पा स्वामी , विमल शेटे, ज्योती काळनाळे , रत्नमाला शेटे , सुकुमार बरांडे , सरोजा राऊत, सुकुमार चिंताले , पल्लवी महिंद्रकर, सुनिता म्हैसकर, रोहिणी नरांडे , शामल पवार , बेबीनंदा पवार , लक्ष्मी चिंताले, गिरीजा सुरलीकर, अनिता ढगे , सपना कासले , मनिषा जळकोटे , कविताताई लद्दे, सुरेखा पवार रतन पवार , कमल पवार आदींसह शिवसेनेचे महिला व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी सोयाबीन अर्थसहाय्य मिळविण्यासाठी कृषि विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन

लातूर, / प्रतिनिधी सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य योजनेअंतर्गत खातेदाराकडून संमती पत्र प्राप्त करून घेण्याची प्रक्रिया मागील काही दिवसांपासून कृषी विभागामार्फत सुरू आहे. ई–पिक पाहणी केलेल्या शेतकऱ्यांची यादी ग्रामस्तरावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यातील शेतकऱ्यांना प्रती शेतकरी २ हेक्टरच्या मर्यादेत कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजार रुपये हेक्टरच्या मर्यादेत देण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे. याकरिता संमतीपत्र व आधार क्रमांक जमा न केलेल्या लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी संबंधित कृषि सहाय्यक किंवा लातूर तालुका कृषि अधिकारी कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ई–पीक पाहणी नोंदणीनुसार शेतकरी खातेदारांच्या याद्या कृषी विभागाने गाव निहाय ठळक ठिकाणी प्रसिद्ध केलेल्या आहेत. परंतू लातूर तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये अद्यापही काही शेतकऱ्यांनी संबंधित कृषी सहायक यांच्याकडे संमती पत्र व आधार क्रमांक जमा केले नाही. २१ सप्टेंबर पासून योजनेअंतर्गत पात्र खातेदारांना अर्थसाह्याचा लाभ प्रत्यक्षात वितरित करावयाचा असल्याने उर्वरित वैयक्तिक व सामायिक खातेदार यांच्याकडून संमतीपत्र प्राप्त करून घेणे, प्राप्त संमतीपत्र माहिती पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने माहिती न भरल्यामुळे काही लाभार्थी वेळेवर मदत मिळण्यापासून वंचित राहू नयेत, यासाठी लातूर तालुक्यातील शिल्लक खातेदारांनी संबंधित कृषी सहाय्यक यांच्याकडे संमतीपत्र जमा करावेत. विशेषतः लातूर शहरानजीक असलेल्या बाभळगाव, कातपूर, सारोळा, लातूर, हणमंतवाडी, आर्वी, सिकंदरपुर, महाराणा प्रताप नगर, मळवटी, कव्हा, चांडेश्र्वर, खोपेगाव, बोरवटी, कासारगाव, गंगापूर, वासनगाव, पाखरसांगवी खाडगाव, वरवंटी, बसवंतपूर, हरंगुळ, नांदगाव व खंडापूर, आदी गावातील यादीतील शिल्लक खातेदारांनी संमतीपत्र २० सप्टेंबरपर्यंत संबंधित कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी यांच्याकडे जमा करावेत. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सोमाणी बिल्डिंग, जुना औसा रोड, लातूर या ठिकाणी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी दिलीप राऊत यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यातील मुलींचा हॉकी संघ ठरला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र

लातूर : लातूर जिल्ह्यातील बिंदगीहाळ या गावातील हनुमान विद्यालयाचा मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला असून नांदेड येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत हा ग्रामीण भागातील संघ विजेता ठरला आहे. विशेष म्हणजे या संघाचे पालकत्व माझं लातूर परिवाराने ७ वर्षांपूर्वी स्वीकारत संघाला भक्कम आधार देण्याचे कार्य केले आहे.

लातूर जिल्ह्यातील हॉकी या आपल्या राष्ट्रीय खेळास हनुमान विद्यालयाच्या मुलींच्या संघाने राष्ट्रीय पातळीवर लौकीक मिळवून दिला आहे. ग्रामीण भागातील या संघातील २ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर तर तब्बल २०० च्या वर खेळाडूंनी राज्यस्तरावर लातूरचे प्रतिनिधित्व केलेले आहे. ग्रामीण भागातील गरीब आणि होतकरू मुली या संघाचे प्रतिनिधित्व करतात. क्रीडासाधनांचा अभाव, मैदान, गणवेश अशा अनेक अडचणींचा सामना करीत या संघाने मिळविलेले यश उल्लेखनीय आहे.




ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन दिले पाहिजे या उद्देशाने माझं लातूर परिवाराने या संघाचे २०१७ साली पालकत्व घेतले. तत्कालीन जिल्हाधिकारी जी श्रीकांत यांच्या हस्ते १७ सप्टेंबर २०१७ साली या संघातील मुलींना हॉकी स्टिक आणि अभ्यासासाठी वह्या देऊन या उपक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर ही खेळाडूंना इतर क्रीडा साहित्य देत परिवाराने आपली सामाजिक बांधिलकी जपली. १३ सप्टेंबर २०२३ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी या संघाला आपल्या कार्यालयात बोलावून खेळाडूंना मार्गदर्शन केले आणि या संघाला विभागीय स्पर्धेत यशस्वी होण्याचे आवाहन केले. यावेळीही माझं लातूर परिवाराच्या वतीने संघातील सर्व खेळाडूंना अद्यावत आणि उच्च प्रतीच्या हॉकी स्टिक देण्यात आल्या होत्या. याप्रसंगी मुलींनी आम्ही खुप परिश्रम घेऊ आणि नक्की यश मिळवू असे आश्वासन पोलीस अधीक्षक मुंडे आणि माझं लातूर परिवाराला दिले होते. आज ते शब्द या मुलींनी खरे ठरवीत दैदिप्यमान यश मिळविले आहे.

ग्रामीण भागातील मुलींनी जिद्द, कठीण सराव आणि कर्तुत्वाने मिळविलेले हे यश इतर खेळाडूंना प्रोत्साहन देत राहील. मात्र शासन स्तरावर अशा होतकरू खेळाडूंना मदतीची गरज आहे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, शासनाचे क्रीडा, शिक्षण विभाग, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी योग्य दिशेने प्रयत्न केले तर राष्ट्रीय पातळीवर लातूरचा लौकीक वाढल्याशिवाय राहणार नाही हे मात्र निश्चित.

### आत्मबोध १७

नाही शांतीचा ओलावा।
सुख नाही त्याच्या गावा।
आपल्या जीवनात यावा।
शांत मित्र ।। १ ।।

अशांताला नाही मुक्ती ।
संतांची हीच उक्ती ।
करू आता भक्ती ।
शांतीसाठी ।। २ ।।

अशांताच्या ठायी ।
सुखाचा पत्ता नाही ।
समाधान कैसे होई ।
जीवनात ।। ३ ।।

अग्नीमध्ये बीजे घातली ।
अग्नितच जर उगवली ।
तर अशांताला मिळाली ।
सुख शांती ।। ४ ।।

राहू आता शांत ।
होई दुःखाचा अंत ।
नाही राहणार खंत ।
जीवनात ।। ५ ।।

सिद्धदास, सोलापूर
१/०२/२०२२



# मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार संपन्न

लातूर/प्रतिनिधी : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती व ब्रिक्स ह्यूमन राइट्स मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. (१७) सप्टेंबर रोजी मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र्य सैनिक, वीर माता,वीर पिता, वीर पत्नी यांच्या सत्कार समारंभाचा कार्यक्रम प्रणवश्री मंगलकार्यालय लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदीप पाटील खंडापूरकर (राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती), कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ले. कर्नल शरद कांबळे( सैनिक कल्याण अधिकारी लातूर ) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ३२ वर्षे पाकिस्तातील जेल भोगून आलेल्या देशभरातील देशभक्तांचाही गौरव करण्यात आला.

आमच्या बहाद्दर सैनिकांनी निजामांच्या विरोधात लढा दिला. अनेक स्वातंत्र्यसेनानी या लढ्यामध्ये शहीद झाले. अशा शूरवीरांच्या उपकाराची परतफेड कधीही करू शकत नाहीत असे उद्गार प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी काढले. आमच्यासाठी देवा पेक्षाही मोठे असणारे देशभक्त संपूर्ण देशभरातून लातूर या ठिकाणी आले याचा विशेष आनंद आहे असे ते म्हणाले.अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती विविध विषय घेऊन अनेक वर्षांपासून देशभरात काम करत आहे. देशातील २९ राज्यात संघटनेच्या शाखा असून पूर्ण क्षमतेने या सर्व ठिकाणी संघटनेचे काम चालू आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आजपर्यंत अवैध दारू विक्री, भ्रष्ट कर्मचारी यांच्या विरोधात आवाज उठवला आहे. दारूबंदीसाठी ज्या ज्या ठिकाणी संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले त्या सर्व ठिकाणची दारू बंद झाली आहे,हे संघटनेचे मोठे यश असल्याचे त्यांनी सांगितले. मागच्या काही दिवसांमध्ये ११भ्रष्ट कर्मचाऱ्यांना सापळा रचून अडकवण्यामध्ये संघटनेचे मोठे योगदान असल्याचेही ते म्हणाले.

सध्या देशांमध्ये महिला सुरक्षित नाहीत. सरकारला महिलांच्या सुरक्षित कडे लक्ष द्यायला वेळ नाही. अशा परिस्थितीत महिलांनी सक्षम राहिले पाहिजे. महिलांनी कुणालाही न घाबरता पर्स मध्ये लिपस्टिक,क्रीम न ठेवता मिरचीची पूड ठेवून वाईट नजर बंद करण्याचा सल्लाही त्यांनी महिलांना दिला. राजकारणी माजी सैनिकांकडे सहानुभूतीपूर्वक पाहत नाहीत. वीर जवानांच्या पत्नी आमच्यासाठी सरस्वती पेक्षाही मोठया आहेत. त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी माजी सैनिकातून एक खासदार करण्याची मागणी आम्ही सरकारकडे करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान वीर माता, पिता,पत्नी यांच्यासह पाकिस्तानातील ३२ वर्ष जेल भोगून आलेले कुलदीप कुमार यादव (गुजरात), पंकज कुमार (पंजाब), राम राजा (जम्मू काश्मीर),भारत भूषण (जम्मू काश्मीर), श्रीमती विष्णु देवी (जम्मू काश्मीर ), श्रीमती सुवर्ण देवी (जम्मू काश्मीर), सुरिंदर पाल (पंजाब) सन्मान करण्यात आला. समाजसेवेची ५३ वर्ष पूर्ण केल्याबद्दल प्रदीप पाटील खंडापूरकर यांचा सर्वांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. माझ्यासाठी आजचा हा ऐतिहासिक क्षण असून मी शहीद जवान आणि त्यांच्या पत्नी,आई–वडील यांना शतशः नमन करतो म्हणत ले. कर्नल शरद कांबळे ( सैनिक कल्याण अधिकारी लातूर ) यांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल नानजकर (अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती) राष्ट्रीय सरचिटणीस, डॉ. संजय जमदाडे यांनी केले तर मनोज तिगाडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी कविता राय जादा (उत्तर प्रदेश), अनिल मिश्रा (झारखंड ), सुबोध कुमार सिंह (बिहार ), गोपी सिराव (राजस्थान ), पंडित तिडके (महाराष्ट्र ), पवन अग्रवाल (राजस्थान), तेज प्रकाश खासा (पंजाब ), राम बेहरा (ओडिसा ), उल्हास पाटील यांच्यासह देशभरातून देशभक्त, माजी सैनिक व संघटनेचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा गांधी विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

लातूर / प्रतिनिधी– महात्मा गांधी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य नागनाथ सूळ होते. महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर उपाध्यक्ष गोविंद मदने, विद्यालयाचे माजी विद्यार्थी विनोद चव्हाण, माणूस प्रतिष्ठान संचलित ङ्गमाझं घरफ प्रकल्पाचे प्रमुख शरद झरे, प्रा. सुधीर साळुंखे, मुख्याध्यापक राठोड आदींची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.



प्रारंभी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या चळवळीतील स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली व प्रमुख अतिथी विनोद चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी बोलताना विनोद चव्हाण यांनी मराठवाड्याला निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त करण्यासाठी लढा उभारणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांची शौर्यगाथा सांगितली. भारतीय स्वातंत्र्याचा लढा हा अहिंसेचा होता परंतु मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा हा सशस्त्र क्रांतीचा होता. स्वातंत्र्य सैनिकांच्या त्याग, बलिदानातून मिळालेले स्वातंत्र्य व त्यांच्या संघर्षाचे स्मरण विद्यार्थ्यांनी करावे असेही ते म्हणाले. शरद झरे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मोबाईलच्या अतिवापराचा आपल्या मनावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य नागनाथ सूळ यांनी इतिहासातील प्रमुख ऐतिहासिक घटनांचे दाखले देत जिद्द, चिकाटी आत्मविश्वासाच्या जोरावर इतिहास देखील बदलता येतो असे सांगितले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते सुमारे शंभर हुशार, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप देखील करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. तानाजी भोसले यांनी केले. सूत्रसंचलन निखिल कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन गणपत सोलंकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. दिलीप केंद्रे, दत्तात्रय धुळशेट्टे, चामे सर, गाजरे सर, काचकुरे सर, मदने सर, काळे सर आदींनी परिश्रम घेतले.

# प्रहार दिव्यांग संघटनेच्या विविध मागण्यासाठी तहसीलदार यांना निवेदन

## मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा



**जळकोट (प्रतिनिधी)** दिव्यांगाना स्वातंत्र्य शिधापत्रिका देऊन त्यांना अंत्योदय योजनेमध्ये समाविष्ट करणे, दिव्यांग रॅम्प, दिव्यांग मानधन, दिव्यांगाची होणारी हेळसांड आदी मागण्या लवकरात लवकर मान्य करण्यात याव्या अन्यथा ता. ७ ऑक्टोंबर रोजी जळकोट तहसील कार्यालयासमोर प्रशासनाची तिरडी काढून जागरण, गोंधळ आंदोलनाचा इशारा प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने तहसीलदार राजेश लांडगे यांना ता. १९ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

जळकोट तहसिल कार्यालय येथील दिव्यांग विना अडथळा रॅम्प मोकळा करणे, दिव्यांगांना देण्यात आलेल्या शिधापत्रिका अद्याप चालू करण्यात आल्या नाहीत व त्यांना अंत्योदय मध्ये समाविष्ट करण्यात आले नाही. कार्यालयामार्फत तालुक्यातील तलाठी यांनी मागील वर्षी गावनिहाय दिव्यांगाची यादी तयार करून, दिव्यांगांना शिधापत्रिका वाटप केल्या नाहीत. तसेच दिव्यांगाचे अर्ज, मानधनास वारंवार विलंब व तहसील कार्यालयात दिव्यांगांची होणारी हेळसांड याबाबत प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने वारंवार निवेदन देऊन सुद्धा योग्य ती दखल घेतली जात नाही. जिल्हाधिकारी लातूर यांच्या पत्राद्वारे जळकोट तहसील कार्यालयास सूचित करूनही सदरील पत्रांना केराची टोपली दाखवण्यात आली आहे.

प्रहार दिव्यांग संघटने मार्फत मागील अनेक वर्षापासून दिव्यांगाना त्यांचे हक्क, अधिकार मागण्या व योजना याबाबत अनेक आंदोलने केली आहेत. शासन परिपत्रक असून सुद्धा दिव्यांगांना शिधापत्रिका, दिव्यांगांना अंत्योदय योजनेमध्ये समाविष्ट करणे हे कार्यालयातील अधिकारी कर्मचारी दुर्लक्ष करतात तहसील कार्यालयाकडे दिव्यांगाची यादी पण नाही. मागील वर्षी गावनिहाय यादी तलाठ्या मार्फत करण्यात आली होती जळकोट तहसीलदार यांनी लवकरात लवकर वरील आमच्या मागण्या मान्य नाही केल्यास संबंधित तहसीलदार व प्रशासनाविरुद्ध तिरडी व जागरण गोंधळ स्वरूपाचे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष माधव होनराव, सचिव नामदेव केंद्रे आदीनी दिला आहे.

# ऐतिहासिक आणि स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शक पुस्तकासह ग्रामीण भागात व्यायाम साहित्याचे वाटप

## इंजि. विश्वजीत गायकवाड फाउंडेशनचा उपक्रम



**उदगीर (प्रतिनिधी)** डोंगरशेळकी ता.उदगीर येथील समर्थ धोंडू तात्या मंदिरात तरुणांसाठी स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शक पुस्तकासह ऐतिहासिक ग्रंथ आणि व्यायाम साहित्याचे वाटप करण्यात आले.

इंजि. विश्वजीत अनिल कुमार गायकवाड फाउंडेशन मार्फत तरुणाच्या आरोग्य आणि विचार संवर्धनाचा संकल्प करण्यात आला आहे. याचाच भाग म्हणून ग्रामीण भागातील तरुणांसाठी वैचारिक साहित्य आणि व्यायामासाठी आवश्यक साधनांची उपलब्धता करून देण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील तरुणांना ऐतिहासिक पुरुषांचे चरित्र माहित व्हावे वैचारिक प्रगल्भता लाभावी यासाठी फाउंडेशन मार्फत धनंजय कीर लिखित डॉ बाबासाहेब आंबेडकर यासह फकीरा, क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर, महात्मा ज्योतिबा फुले, श्रीमान योगी, लोकराजा शाहू छत्रपती, राष्ट्रपती द्रोपदी मूर्मु राजर्षी शाहू महाराज यासह पोलीस भरती, ग्राम सेवक, तलाठी, बँक आदी स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शक पुस्तक देण्यात येत आहेत.

तरुणांनी आपले ज्ञान वाढवावे आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आरोग्य चांगले राहावे यासाठी व्यायाम करावा. या ऐतिहासिक ग्रंथामुळे तरुणांना जीवन कसे जगले पाहिजे याबाबत ऐतिहासिक थोर पुरुषांचे चारित्र्य वाचून समजेल आणि व्यायाम साहित्य मदतीमुळे आरोग्य चांगले ठेवून स्पर्धा परीक्षेसाठी पूर्ण तयारी करता यावी यासाठी ग्रामीण भागातील तरुणांना ग्रंथ आणि व्यायाम साहित्य देण्यात येत असल्याचे इन्जि. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाऊंडेशन चे अध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांनी सांगितले.

> ग्रामीण भागात भेटीसाठी गेलो असता तरुणाना स्पर्धा परीक्षेसाठी ग्रंथ उपलब्ध नसल्याचे लक्षात आले तसेच अनेक गावात तरुणांना व्यायाम करण्यासाठी साधने नसल्याचे लक्षात आले. तरुणांनी वाचनाने विचार संपन्न व्हावे आणि आरोग्य चांगले राखावे यासाठी फाऊंडेशन चे माध्यमातून गावातच पुस्तके आणि व्यायाम साहित्य उपलध करून देत आहे.

यावेळी माजी सरपंच चंद्रपाल शेळके,, माजी सरपंच मारोती मुंडे, चेअरमन हाणमंत मुंडे, नरसिंग मुंडे, बाबुराव मुंडे, लखन मुंडे, अजय मुंडे यांच्यासह गावातील तरुण उपस्थित होते.

# डॉ.राधाकृष्णन प्राथमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा




**उदगीर (प्रतिनिधी)** येथील डॉ. राधाकृष्णन प्राथमिक विद्यालयात, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त आदर्श शिक्षक विश्वनाथराव मुडपे गुरुजी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सचिव देविदासराव नादरगे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त आदर्श शिक्षक सूर्यकांतराव पांचाळ गुरुजी यांची उपस्थिती होती. शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून हैद्राबाद मुक्ती संग्रामाबद्दल माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. विश्वनाथराव मुडपे गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मराठवाडा मुक्ती संग्राम दिन याबद्दल माहिती सांगितली व स्फ्फूर्ती गीतांचे गायन केले, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष देविदासराव नादरगे यांनी इतिहास माहिती असणे किती गरजेचे असते याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित बिराजदार यांनी केले. प्रास्ताविक मु. अ. ज्ञानोबा कुंडगिरे यांनी तर आभार वर्षाताई पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रफुल्लता बोडके, मनोरमा तेलंगे, सुनिता शिंदे, हेमा कुलकर्णी, वर्षा बिरादार, प्रशांत पांचाळ, शशिकुमार पाटील, गोविंद रावळे, विठ्ठल नादरगे, अमोल कांबळे यांनी परिश्रम घेतले.

**CHANGE OF NAME**

I Vedant Manoj Pudale S/o Prerena Manoj Pudale am changing my mother's name which was earlier : Prerena Manoj Pudale To: Prerna Manoj Pudale and will use Prerna Manoj Pudale for all future purposes.

**Old Name:Prerena Manoj Pudale**

**New Name:Prerna Manoj Pudale**

Address: Hanuman katta , near uday tokij Udgir , Latur, Maharashtra, 413517.

*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय*

(दंडणीय- विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.०५/०९/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार पिराजी जानोबा सावंत रा.शेकापूर यांची आई नामे पदमीन ज्ञानोबा सावंत यांचा मृत्यु दिनांक १०/०४/२००८ रोजी मौजे शेकापूर ता. उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची मृत्युची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार यांनी त्यांची आई यांचा मृत्यु दिनांक १०/०४/२००८ रोजीची नोंद जन्म/मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०५/०९/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांची आई यांचा मृत्यु दिनांक १०/०४/२००८ रोजी मौजे शेकापूर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार पिराजी ज्ञानोबा सावंत रा.शेकापूर यांची आई नामे पदमीन ज्ञानोबा सावंत यांचा मृत्यु दिनांक १०/०४/२००८ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय शेकापूर ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ०५/०९/२०२४ रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख ०६/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

**वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७४२/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Shankarrao Basvantrao Patil हे R/o Netragao Tq.Udgir Dist.Latur दि.०५/०१/२०१५ रोजी At. Netragao Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Shivraj Shankarrao Patil, Age-65.
2) Dhanraj Shankarrao Patil, Age-62,
Occu-Agri R/o. Netragao Tq. Udgir Dist. Latur
3) Umakant Shankarrao Patil, Age-58,
4) Vandanabai Ashok Patil, Age-60,
5) Vijaya Jagannath Biradar, Age-56
6) Kashibai Maharudra Honrao Patil, Age-54
7) Manisha Baswaraj Hedgapure, Age-50

यांनी खालील नमुद ७ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Shivraj Shankarrao Patil | 65 | Son |
| 2) Dhanraj Shankarrao Patil | 62 | Son |
| 3) Umakant Shankarrao Patil | 58 | Son |
| 4) Vandanabai Ashok Patil | 60 | Daughter |
| 5) Vijaya Jagannath Biradar | 56 | Daughter |
| 6) Kashibai Maharudra Honrao Patil | 54 | Daughter |
| 7) Manisha Baswaraj Hedgapure | 50 | Daughter |

अर्जदार यांना Shankarrao Basvantrao Patil या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Shankarrao Basvantrao Patil याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २२/१०/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

**वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**

**मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६४७/२०२४ नि.क्र. ०७

ज्यापेक्षा नामे 1) Vishwambhar S/o. Hanmantrao Dongrajkar (Kulkarni) हे दिनांक १३.०४.१९९२ रोजी At. Somnathpur Tq.Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत 2) Prabhavati W/o. Vishwambharrao Dongrajkar (Kulkarni) हे दिनांक ०६.१२.२०२० रोजी At. Vivekanand Hospital Latur.

Ambika D/o. Vishwambharrao Daughter Kulkarni (Dongrajkar) Age 46 R/o. Somnathpur Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद ८ हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Ambika D/o. Vishwambharrao Daughter Kulkarni (Dongrajkar) | 46 | Daughter |

अर्जदार यांना 1) Vishwambhar S/o. Hanmantrao Dongrajkar (Kulkarni) 2) Prabhavati W/o. Vishwambharrao Dongrajkar (Kulkarni) या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू 1) Vishwambhar S/o. Hanmantrao Dongrajkar (Kulkarni) 2) Prabhavati W/o. Vishwambharrao Dongrajkar (Kulkarni) याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १०/१०/२०२४

डी.ए.कांबळे, कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

**उदगीर मनोरंजन**

**कल्पना** 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो







**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365

१,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# मनपाच्या पिण्याच्या पाण्याच्या नळाला आल्या लहानशा पांढऱ्या जीवंत आळ्या

## महिला वर्गात पसरली भीती व घबराट

लातूर, दि.१९, शहर महानगर पालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या नळातून, आज १९ सप्टेबर रोजी विवेकानंद चौक परिसरात सकाळी ९ च्या सुमारास, चक्क लहान - लहान व लाबंट अशा पांढ-या आळ्या मोठ्या प्रमाणात आल्याने, महिला वर्गात सर्वत्र भिती आणि घबराट पसरली आहे.



महानगर पालिकेच्या घरगुती पिण्याच्या पाण्याच्या नळाला नेहमीप्रमाणे, आज गुरुवारी विवेकानंद चौक व मातोश्री रमाई नगरमध्ये सकाळी पाणी सुटले होते. महिला वर्गाने प्रारंभीचे थोडे पाणी सांडावांडी करिता म्हणून घेतले. तसेचे नित्य पिण्यासाठी म्हणून, पातळ दुहेरी सुती कपड्याने गाळून घेतले. आणि मग साठवणीसाठी म्हणून स्वच्छ केलेल्या भांडी व टाक्यामध्ये पाणी घेत असताना, हा प्रकार कांही महिलांच्या लक्षात आला. नळातून आलेल्या पाण्यावर पांढ-या रंगाच्या, कांही २-३ से. मी. च्या तर कांही ४-५ से.मी. लांबीच्या आणि हात शिलाईच्या लहान सुईच्या अर्ध्यापेक्षा अधिक जाड अकाराच्या असाव्यात. शिवाय त्या पाण्याखाली थरात न राहता वा जाता, त्या अगदी वरतीच तरंगत होत्या. यापूर्वी शनिवार १४ सप्टेंबर रोजी सोडण्यात आलेल्या, पाण्यात सुद्धा अगदी असाच प्रकार निदर्शनास आला होता. मात्र यदा-कदाचित कांहीसी एखाद घटना असावी म्हणून, महिलांनी त्याकडे दुर्लक्ष केले होते. परंतु परत पुढे ५ दिवसांनी पण तोच प्रकार झालेला दिसून आला. त्यामुळे महिलानी संताप व्यक्त केला आहे. आणि लातूर महानगर पालिका प्रशासनाने, यात तातडीने लक्ष घालून चौकशी करावी. आणि याचा अंतिम शोध घेऊन योग्य प्रतिबंध करावा, अशी जाहीर मागणी सुंदरताई कांबळे, मधुश्री शिंदे, सूर्या रायवाडीकर व सोनाली भारती आदी महिलांनी केली आहे.

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT IN HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER ABHINAV PRAFULLAKUMAR SHAHA TO ABHINAV PRAFULLA SHAHA HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE ABHINAV PRAFULLA SHAHA IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILAY HUSBAND/WIFE, CHILDREN & RELATIVE.

**OLD NAME**
ABHINAV PRAFULLAKUMAR SHAHA
**NEW NAME**
ABHINAV PRAFULLA SHAHA
**ADDRESS**
Atul Metal Works, Plot No.-C/8 MIDC Latur. Mob. No. 9890917390

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT IN HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER AKSHAY PRAFULLAKUMAR SHAHA TO AKSHAY PRAFULLA SHAHA HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE AKSHAY PRAFULLA SHAHA IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILAY HUSBAND/WIFE, CHILDREN & RELATIVE.

**OLD NAME**
AKSHAY PRAFULLAKUMAR SHAHA
**NEW NAME**
AKSHAY PRAFULLA SHAHA
**ADDRESS**
Atul Metal Works, Plot No. C/8, MIDC Latur. Mob. No. 9890917390

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT IN HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER VAIBHAV PRAFULLAKUMAR SHAHA TO VAIBHAV PRAFULLA SHAHA HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE VAIBHAV PRAFULLA SHAHA IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILAY HUSBAND/WIFE, CHILDREN & RELATIVE.

**OLD NAME**
VAIBHAV PRAFULLAKUMAR SHAHA
**NEW NAME**
VAIBHAV PRAFULLA SHAHA
**ADDRESS**
Atul Metal Works, Plot No. - C/8, MIDC Latur. Mob. No. 9890917390

## जाहीरनामा

**श्रीमती ए. ए. गोडसे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांचे न्यायालयात**

कोर्टाचा शिक्का

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १४६५/२०२४**
**सत्यभामा व इतर वि. निरंक,**
**निशाणी क्र. ६**

**वारसाचे प्रमाणपत्र मिळेणबाबत**

ज्यापेक्षा मयत दत्तात्रय गोविंद कुलकर्णी दिनांक २४.१२.२०२१ रोजी लातूर येथे मयत झाले असून अर्जदार,
१.सत्यभामा दत्तात्रय कुलकर्णी, वय ८६ वर्ष, धंदा घरकाम,
२.उत्तम दत्तात्रय कुलकर्णी, वय ७२ वर्ष, धंदा सेवानिवृत्त,
३.शकुंतला दत्तात्रय कुलकर्णी, वय ७२ वर्ष, धंदा घरकाम,
वरील सर्व रा. साळे गल्ली, हनुमान रोड, लातूर, ता. जि. लातूर. यांनी सदरहू मयताचे मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयासमोर अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास त्याला सदरहू मयत याचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.
आज तारीख २७.०८.२०२४
पु.ने.ता.:- २६.०९.२०२४

**व्ही. डी. सिरसाट)**
**(क. लिपीक**
**२२ सह दिवाणी**
**न्यायालय, व. स्वर, लातूर**

**आदेशावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**व स्तर लातूर**

पान १ वरून

### अमेरिकची...

करण्याचा प्रयत्न असतो. सोप्या शब्दात संपूर्ण चक्र हे मागणी आणि पुरवठा यांच्याशी निगडीत असते. देशात मागणी वाढलेली असताना पुरवठा कमी होऊ लागला तर त्यास्थितीत महागाईत वाढ झालेली दिसते.

### भाजपाच्या...

स्तरावरील अरवली जंगल सफारी पार्क बनवणार. देशातील कोणत्याही सरकारी महाविद्यालयातून वैद्यकीय आणि अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या ओबीसी आणि एससी प्रवर्गातील हरियाणातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल. त्यासोबतच राज्य सरकार ओबीसी श्रेणीतील उद्योजकांसाठी मुद्रा योजनेव्यतिरिक्त २५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाची हमी देणार असून प्रत्येक जिल्ह्यात ऑलिम्पिकच्या खेळांसाठी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली जाणार आहे.

### मुस्लिम...

मतदारांच्या पाठीशी आहोत, असा संदेश देण्याचा प्रयत्न अजितदादा गट करत असल्याचे बोलले जात आहे.

अजित पवारांचे फेसबुक पेज हॅक?

अजित पवार यांचे फेसबुक पेज हॅक झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कारण अजित पवार यांचे सोशल मीडिया हँडल्स आणि फेसबुक पेजवरून काही अज्ञात लोकांना फॉलो करण्यात आले आहे. यासंबंधी आम्ही सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल करणार असल्याची माहिती अजितदादा गटाचे प्रवक्ते सूरज पाटील यांनी दिली.

### कलम...

काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फ्रन्सच्या भूमिकेला पाठिंबा देतो, अशी टीका अमित मालविय यांननी केली. जो पाकिस्तानचा मुद्दा आहे तोच काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फ्रन्सचा मुद्दा आहे, हे आता स्पष्ट झाले आहे असे भाजपा नेते शहजाद पूनावाला म्हणाले.

### किल्लारी...

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील बेरोजगार युवकांना कर्ज योजना आणि व्याज परतावा योजनेचा लाभ दिला जात आहे. राज्य शासनाने राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, पैलवान मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ, गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, जगतज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ, सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ अशी विविध विकास महामंडळे स्थापन केली आहेत. यामाध्यमातून बहुजन कल्याणाच्या योजना राबविण्यात येणार असल्याचे ना. सावे म्हणाले.

वंचितांना न्याय देण्याचे काम राज्य शासनामार्फत होत आहे. विमुक्ती जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांसाठी १ हजार ५५४ अभ्यासक्रमांना राज्य शासन शिष्यवृत्ती देत आहे. या योजनांची माहिती तळागाळातील लोकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे आमदार अभिमन्यू पवार म्हणाले. तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत औसा मतदारसंघात वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत सुमारे ११ कोटी निधी उपलब्ध करून दिला. तसेच लातूर जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण वैयक्तिक घरकुल योजनेतून सुमारे ३१ कोटी रुपये निधी दिल्याबद्दल त्यांनी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना. सावे यांचे आभार मानले.

आमदार योगेश टिळेकर यांनीही आपल्या मनोगतामध्ये राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. माजी मंत्री बसवराज पाटील यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील नागरिकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने सर्वेक्षण करून राज्यातील सुमारे ६ लाख भटक्या विमुक्तांना आधारकार्ड, रेशनकार्ड उपलब्ध करून देण्याची कार्यवाही केली आहे. यानिमित्ताने शासन भटक्या विमुक्तांच्या पालावर पोहचले. त्यांना विविध योजनांचा लाभ दिला, असे सांगून भटके विमुक्त विकास परिषदेचे कार्यवाह नरसिंग झरे यांनी राज्य शासनाचे आभार मानले.

लाभार्थ्यांना विविध योजनांच्या लाभांचे वाटप

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात लाभ प्रमाणपत्र देण्यात आले. यामध्ये औसा येथील दिलीप शंकरराव गोदमे यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण विभागाच्यावतीने गृहपयोगी साहित्य, किनीथोट येथील अंगद भाऊराव काळे यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून सिंचन विहीर, अपचुंदा येथील रामेश्वर ज्ञानोबा कात्रे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी आवास योजनेतून घरकुल, किल्लारी येथील श्रीमती द्वारकाबाई पांढरी गायकवाड यांना संजय गांधी निराधार योजनेतून निवृत्तीवेतन लाभ वितरीत करण्यात आला.

पारंपारिक वेशभूषेत आलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील बांधवांनी प्रारंभी मान्यवरांचे स्वागत केले. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजनांची माहिती देण्यासाठी लावण्यात आलेल्या विविध दालनांचे मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक दिलीप राठोड यांनी केले. गट विकास अधिकारी युवराज म्हेत्रे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

### दयानंद विज्ञान...

साठी प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड यांचे अनमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मानताना मुख्य संपादक म्हणून प्रा.मेघा पंडित यांनी उन्मेष वार्षिकांक हा दयानंद विज्ञान महाविद्यालयाचा आरसाच आहे.

या वार्षिक अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सृजनशील लेखननिर्मितीला निश्चितच वाव मिळालेला आहे.विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभव व प्रतिभाशक्तीच्या जोरावर दर्जेदार कथा,कविता,वैचारिक लेख,सुविचार,चारोळ्याचे लेखन केलेले आहे.यातूनच विद्यार्थ्यांच्या सुप्त लेखन कौशल्याला वाव मिळण्याबरोबरच महाविद्यालयाने वर्षभरात साहित्य,संगीत,कला,क्रीडा,

विज्ञान,बारावी बोर्ड परीक्षा,निट,जेईई,सीईटी परीक्षा आणि सामाजिक इ.अनेक क्षेत्रात केलेल्या नेत्रदीपक अद्वितीय कार्याचा हा वार्षिकांक दस्तऐवजच आहे,असे सांगितले.

यावेळी क्रीडा व विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्था संचलित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य,पर्यवेक्षक,कार्यालयीन अधीक्षक,प्राध्यापक,कार्यालयीन कर्मचारी,कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,पालक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**DECLARATION**
**Change OF Name**

Here in this advertise I am declaring that I have change my which was earlier : Shaikh Sarvar Rasul To Shaikh Sarvar Rasulsab Hence for this Declaration I Will be known by this Name and will use Shaikh Sarvar Rasulsab In future The same name will be used by my family Wife, children & relative.

**Old Name**
Shaikh Sarvar Rasul
**New Name**
Shaikh Sarvar Rasulsab
**Address**
Ram Nagar, Ausa Road, Latur.

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार वर्षाबाई गुलाबराव मेटे रा. चाटा ता. जि. लातूर यांनी दिलेल्या माहितीवरुन, दाखविलेल्या कागदपत्रावरुन व मला अधिकृत केलेवरून लातूर जिल्हयातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, मी. हरंगुळ (बु.) ता. जि. लातूर येथील जमीन गट नं. ८४ पैकीचा याचा प्लॉट नं. ११ विक्री करत असून याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. ७६०२/II याचे विक्री क्षेत्र रुंदी दक्षिण उत्तर ३० फुट व लांबी पूर्व पश्चिम-४० फुट याचे विक्री एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट. जागा याची चतुः सिमा पुढीलप्रमाणे
पुर्वेस-सदर गटातील जमीन,पश्चिमेस-६ मिटर रुंदीचा रस्ता
दक्षिणेस-६ मिटर रुंदीचा रस्ता,उत्तरेस-प्लॉट नं. १२
येणेप्रमाणे वरील नमुद चंतुः सिमेच्या आतील सदर प्लॉटचे विद्यमान मालक शेख समीर नबीसाब रा. नाथ नगर, लातूर यांच्याकडुन सदरील प्लॉटचे ठरावपत्र करुन घेतलेले असून ते महमंद जमीर मनियार रा. इस्लामपुरा तावरजा कॉलनी, लातूर ता. जि. लातूर यांनी सदर प्लॉट विक्रीचा ठराव करुन दिला आहे व त्यांनी सदर प्लॉट माझे पक्षकारास कायमस्वरुपी विक्रीचा ठराव करुन ठरावापोटी काही रक्कम स्विकारलेली आहे. व सदर प्लॉटचे खरेदीखत मूळ मालकाकडुन माझे पक्षकाराच्या हक्कात करुन देण्याची हमी माझ्या पक्षकारास दिलेली आहे. तरी वरील वर्णनिय प्लॉटबाबत जर कोणाचा काही हक्कसंबंध, हितसंबंध, सरकारी अथवा निमसरकारी कर्ज, बोजा, लिज, कोर्ट प्रकरण, डिक्री, गहाण, तारण, वारसा, बक्षीस, करार इत्यादी किंवा कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध असतील तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन सात (०७) दिवसाचे आत माझ्याकडे किंवा माझ्या पक्षकाराकडे खालील दिलेल्या पत्यावर लेखी आक्षेप नोंदवावेत, मुदतीत आक्षेप नाही आल्यास सदरचा प्लॉट हा निर्विवाद, निजोखमी समजण्यात येईल व माझे पक्षकार खरेदीखत त्यांच्या हक्कात करुन घेतील च मुदतीनंतर आलेले कसल्याही प्रकारचे आक्षेप / उजर माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक १९/०९/२०२४
तर्फे
**Adv. PV. Kalure**
**Notary Govt. Of India**
**Latur. Dist. Latur**

**जाहीर प्रगटन देणार**
**वर्षाबाई गुलाबराव मेटे**
**रा. चाटा ता. जि. लातूर**
**मो. नं. ९६५७४८८०५९**

## जाहीरनामा

**रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर २४९/२०२४**
**यशोदाबाई व इतर ५ वि.निरंक**
**निशाणी क.**

**वारसाचे सर्टिफिकेट मिळणेबाबत**

ज्यापेक्षा मयत लक्ष्मण रामा बने, रा. बिटरगांव ता. रेणापूर जि. लातूर हे अनुकमे दि. ०६/०२/२०२२ रोजी बिटरगाव ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि यशोदाबाई भ्र. लक्ष्मण बने, रा. बिटरगांव ता. रेणापूर जि. लातुर हयांनी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार
१. यशोदाबाई भ्र. लक्ष्मण बने, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम,
२. दत्ता पिता लक्ष्मण बने, वय ३६ वर्षे, धंदा शेती,
३. दिगांबर पिता लक्ष्मण बने, वय ३४ वर्षे, धंदा शेती, सर्व रा. बिटरगांव ता. रेणापूर जि. लातूर
४. जिजाबाई भ्र. मुकिंद हाके, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. टाकळी ता. जि. लातूर
५. गंगासागर भ्र. चंद्रकांत गुंटे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. इंद्रनगर लोहा ता. लोहा जि. नांदेड
६. बालीका भ्र. बालाजी गुराटे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि. बीड, ....अर्जदार
यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू लक्ष्मण रामा बने, चे वारस सर्टिफिकेट देईल.
पुढील तारीखः २२/१०/२०२४
तारीखः १९/०९/२०२४

**क. लिपिक**
**दि.न्या.क. स्तर,**
**रेणापूर**

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर रेणापुर**

परिशिष्ट – ३
(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, लातूर**
मध्यवर्ती प्रशासकीय ईमारत, जुने क्लेक्टर ऑफीस जवळ, लातूर - ४१३५१२

दूरध्वनी क्र ०२३८२ - २४५२१७ Email ID : akeemilsltr@gmail.com

## निविदा सूचना क्र. ०३ /२०२४-२५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने, जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, लातूर, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन ) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, लातूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत | इसारा/ बयाना रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिखली गेटेड सिनाबा क्र. १ चे बांधकाम तालुका अहमदपूर जि. लातूर | ५००३०१५ | ५०५०० | १२ महिना | २३६० |
| २ | चिखली सिनाबा क्र. १ चे बांधकाम तालुका अहमदपूर जि. लातूर | ४३३५६०९ | ४३५०० | १२ महिना | २३६० |
| | एकूण | ९३३८६२४ | | | |

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. 23/09/2024 ते 30/09/2024
ई-निविदा उघडण्याचा दिनांक - 02/10/2024

स्वाक्षरीत

जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग, लातूर

ाका/लातूर/जाहि.क्र.६०/२०२४-२०२५

**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26



# यशवंत

शुक्रवार दि. २० सप्टेंबर २०२४

# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


## सहा वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार; आरोपीस २० वर्षे सश्रम कारावास व २५ हजार रु. दंडाची शिक्षा उदगीर जिल्हा व सत्र न्या. पी.डी. सुभेदार यांच्या न्यायालयाचा निकाल

**उदगीर (प्रतिनिधी)** पोलीस स्टेशन उदगीर ग्रा. जि. लातूर घटनेची थोडक्यात हकिकत अशी की, पिडीत मुलगी व आरोपी अब्दुल मुखीद जैनोलाबेद्दीन शेख हे एका गल्लीत रहात होते. आरोपी हा पिडीत मुलीला खेळण्यासाठी मोबाईल देत असे घटने दिवशी आरोपीने पिडीतास खेळण्यासाठी मोबाईल दिला व त्यावेळी आरोपीने पिडीत मुलीसोबत लैंगिक अत्याचार केला. सदरची बाब पिडीत बालीकेने तिचे आईस सांगितली असता पिडीतेच्या




आईने उदगीर ग्रा. पोलीस स्टेशन येथे तकार दिली. त्या तकारीवरुन आरोपीविरुध्द कलम ३७६ (अब), ३५४ भादवि तसेच कलम ४, ६, ८,१०, १२ बा.लैं.अ.प्र.का. अन्वये गुन्हा नोंद करुन गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक तानाजी चेरले यांनी केला व आरोपीविरुध्द दोषारोपपत्र मे. न्यायालयात दाखल केले.

उदगीर येथील मे. अति. जिल्हा सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली ज्यात सरकार पक्षाच्या वतीने एकुण ०८ साक्षिदारांची साक्ष नोंदविण्यात आली तसेच बचाव पक्षातर्फे एकुण ०४ साक्षिदार तपासण्यात आले. सरकार पक्षाच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या साक्षिदारांच्या साक्षिपुराव्यांवर व बचाव पक्षाच्या साक्षिदारांच्या उलट तपासणीवर व कागदपत्रावरती तसेच सहा. सरकारी वकील ॲड. शिवकुमार गिरवलकर यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरुन मे. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. पी.डी. सुभेदार यांनी सदरील आरोपी अब्दुल मुखीद जैनोलाबेद्दीन शेख यास २० वर्षे सश्रम कारावास व विविध कलमान्वये एकत्रीत २५,०००/- रु. दंड तसेच दंड न भरल्यास एक वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

सदरील प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने सरकारी वकील म्हणून ॲड. शिवकुमार गिरवलकर यांनी काम पाहिले. तसेच कोर्ट पैरवी अधिकारी पो.हे.कॉ. ४८ अक्रम शेख यांनी सहकार्य केले.

## डॉ. शिरिष पटवर्धन यांचे आरोग्य विषयावर उद्या व्याख्यान

**जळकोट (प्रतिनिधी)** जेष्ठ आरोग्य तज्ञ डॉ. शिरिष पटवर्धन यांचे आरोग्य विषयक जनजागरण उद्या शनिवार दि. २१ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा उदगीर शहर व परिसरातील जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.



उदगीर येथील स्त्रीरोग व प्रसुती संघटना, लॉयन्स क्लब उदगीर व उमांग, संत ज्ञानेश्वर विद्यालय, जेष्ठ नागरीक संघ, मराठवाडा जनता विकास परिषद व हरित वसुंधरा या सेवाभावी संघटनेच्या वतीने उद्या शनिवार दि. २१ सप्टेंबर रोजी रघुकुल मंगल कार्यालयात सायंकाळी ५ वाजता आरोग्याविषयी जनजागृती व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

यावेळी डॉ. शिरिष पटवर्धन हे "पोट आत व रोग बाहेर भक्तीभावे" "करोडोपती पासबुक भक्तीभावे" डॉ.शिरिष पटवर्धन यांची उदगीरकरांसाठी करोडोपती लस भक्तीभावे देवून करोडोपती बनण्याची सुवर्ण संधीचा लाभ घेण्याचे आवाहन उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष तथा मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष डॉ. आर.एल. लखोटिया व उदगीर स्त्रीरोग व प्रसुती संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रा.डॉ. रामचंद्र पस्तापुरे यांना राष्ट्रीय आदर्श प्राध्यापक गौरव पुरस्कार




**जळकोट (माधव होनराव)** येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रामचंद्र नामदेवराव पस्तापुरे यांना राष्ट्रीय आदर्श प्राध्यापक गौरव पुरस्कार बसवंत नागू शिंगाडे सामाजिक सेवाभावी संस्था-कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा यांच्या वतीने कोल्हापूर येथे तृप्ती देसाई, रविंद्र कुलकर्णी, डॉ. विक्रम शिंगाडे आदी मान्यवरांच्या हस्ते मराष्ट्रीय प्रेरणा गौरव आदर्श प्राध्यापक पुरस्कारप प्रदान करण्यात आला.

डॉ. पस्तापुरे हे संभाजीराव केंद्रे महाविद्यालय मध्ये मागील २४ वर्षापासून कार्यरत असून त्यांनी प्र.प्राचार्य, उपप्रचार्य, प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्य केले आहे. तसेच ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक असून त्यांचे राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत. त्याचबरोबर अखिल भारतीय साहित्य परिषदेचे लातूर जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत.विद्याभारतीचे लातूर जिल्हा अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या एकूणच कार्याचा आढावा घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

डॉ. पस्तापुरे यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मानवेंद्र केंद्रे, अध्यक्ष डॉ. भागवत केंद्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने, कार्यालयीन अधीक्षक अनिल केंद्रे, प्रा. डॉ. व्ही.आय. पाटील, ग्रंथपाल डॉ नामदेव राठोड,आय क्यू ए सी चे समन्वयक डॉ. एन. पी. कुडकेकर प्रा. डॉ. माधव कांबळे, डॉ. तातेराव केंद्रे,सहा. प्रा. पी. एस. कांबळे,डॉ. व्ही. टी.कल्लूरकर, डॉ. जे. पी शेळके, डॉ. डी. एस. टिमकीकर, डॉ. ए. जी. जोशी यांच्यासह महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## शासकीय डेअरी यंत्रसामुग्री विक्री करण्याच्या निषेधार्थ डेअरी बचाव धरणे आंदोलन संपन्न




**उदगीर (प्रतिनिधी)** शासकीय दुध योजना पुनरुजीवन समिती उदगीरच्या वतीने गुरुवार दि. १९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता उदगीर शासकीय दुध डेअरी समोर डेअरी बचाव धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात उदगीकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला.

शासकीय दुध योजना उदगीर येथील दुध भुकटी प्रकल्प हा उदगीरकरांच्या जिव्हाळयाचा विषय शासनकर्ते व राज्यकर्त्यांच्या उदासिनतेमुळे हा प्रकल्प बंद पडला असुन या दुध डेअरीतील यंत्रसामुग्री भंगारमध्ये विकण्याचा घाट सरकारने घातला असुन सदरील अब्जावधी रुपयाच्या जागेवर डोळा असल्याने उदगीरच्या अस्मिता असलेल्या हया दुध डेअरीच्या जागेवर दुध डेअरीचा नविन प्रकल्प सुरु करावा या मागणीसाठी शासकीय दुध योजना पुनरुजीवन समितीच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात उदगीर, देवणी, जळकोट तालुक्यातील शेतकरी दुध उत्पादक, व्यापारी, शैक्षणिक, व सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी या धरणे आंदोलनात सहभागी झाले होते. यात प्रामुख्याने माजी आ. शिवराज तोंडचिरकर, सामाजिक कार्यकर्ते रंगा राचुरे, शासकीय दुध योजना पुर्नजीवन समितीचे निमंत्रक अशिष पाटील राजुरकर, रेल्वे संघर्ष समितीचे सचिव मोतीलाल डोईजोडे, ॲड. नरेश सोनवणे, प्रा. एस.एस.पाटील, अजित शिंदे, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, अहमद सरवर, ओंकार गांजुरे, संतोष कुलकर्णी, शिवकुमार जाधव, चंद्रकांत टेंगेटोल, कपिल शेटकार, रमाकांत चटनाळे, विरेंद्र स्वामी, शिवाजी पाटील, साईनाथ चिमेगावे, रविंद्र कोरे, बस्वराज पाटील, कैलास पाटील, ज्ञानोबा साखरे, फारुख चाउस, गौस अहमद, अजय शेटकार, सुर्यभान चिखले, संदिप पाटील, ईश्वर समगे, सुभाष सुर्यवंशी, सिद्राम बेलकुंदे, काशिनाथ स्वामी, शेख दस्तगीर, विरभद्र बाळे, संगमेश्वर म्हेत्रे, किरण बोडके, प्रा. शिवाजीराव मुळे, सुशांत बनसोडे, श्रीमती लक्ष्मीबाई पांढरे, सौ. कांता बुळळा, सौ. देशमुख, अविनाश रायचुरकर, भरत दिक्षित, संजय राठोड, नाना ढगे, संतोष फुलारी, गजानन सताळकर, डॉ. मंगेश हेरकर, प्रभावती बिरादार, शांताबाई लातुरे, महादेव मोतीपवळे, रविंद्र मलगे, ॲड. दयानंद उदबाळे, दत्तात्रय पाटील, शंकर मोरे, नेमीचंद पाटील यांच्यासह नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.


## घर विकणे आहे

**उदगीर नगर परिषद हद्दीतील शाहू कॉलनी (उत्तर भाग) देगलूर रोड, उदगीर जि.लातूर येथील प्लॉट नं. २४ जागा क्षेत्रफळ ३१६९ चौ. फुट व त्यावरील तळमजल्यावरील कॉलम आरसीसीचे घर योग्य किंमत आल्यास विक्री करणे आहे.**

संपर्क

**डॉ. राजु लक्ष्मणराव ढोबळे**

मो.नं. ९४२२६१२६८२

९६६५५७४३४५


## मुक्तिसंग्रामाच्या चित्रप्रदर्शनातून मुक्तिसंग्रामाच्या ज्ञानाचा खजिना.... शिक्षक व विद्यार्थ्यांच्या भावना...

**उदगीर (प्रतिनिधी)** मुक्तीसंग्रामाच्या चित्रप्रदर्शननाने आमच्या या लढ्याबद्दलच्या संकल्पना स्पष्ट केल्या, मुक्ती संग्राम म्हणजे काय हे किमान कळल्यास मदत झाली अशी भावना शालेय विद्यार्थी व शिक्षकांनी व्यक्त केल्या. मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने आयोजित चित्रप्रदर्शनास उदगीर मध्ये मोठा प्रतिसाद मिळत आहे. मराठवाडा मुक्तिदिनी सुरुवात झालेल्या या प्रदर्शनाचा रविवारी समारोप होणार आहे.

मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या अनुषंगाने झालेल्या लढाया, लढवय्ये यांसह या लढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या नोंदी असणाऱ्या





वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन उदगीरच्या महाराष्ट्र जनता विकास परिषदेने केले आहे. उदगीर येथील हुतात्मा स्मारकात या प्रदर्शनाचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, नगर परिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्या उपस्थितीतझाले. मुक्तिसंग्रामात लढल्या गेलेल्या लढाया, त्या काळातील कागदपत्रे, छायाचित्रे, स्वातंत्र्यवीरांचे कार्य या चित्रपटाच्या माध्यमातून नागरिकांना मुक्तिसंग्रामाची माहिती देत आहे. शालेय विद्यार्थ्यांनी हे प्रदर्शन पाहण्यासाठी मोठी गर्दी केली असून विविध शाळांचे विद्यार्थी या प्रदर्शनास भेट देऊन मुक्तिसंग्रामाबद्दलची माहिती मिळवत आहेत. याशिवाय नागरिकांनीही भेट देऊन मुक्तिसंग्रामाचा इतिहास जाणून घेतला आहे. मराठा जनता विकास परिषदेच्या स्थानिक शाखेने यामधील काही निर्मिती केली असून जिल्हा प्रशासनाच्या वतीने निर्मित चित्रांचाही या चित्रप्रदर्शनात समावेश आहे. शहरातील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट देऊन मुक्तिसंग्रामाचा इतिहास जाणून घेतला. मुक्तिसंग्रामाचे अभ्यासक धनंजय गुडसूरकर हे विद्यार्थ्यांना या उपक्रमाविषयी व लढा या विषयी माहिती देत आहेत. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी जनता विकास परिषदेच्या स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया, सचिव प्रवीण जाहूरे, उपाध्यक्ष एस .एस. पाटील, माधव खताळ, विश्वनाथ बिरादार माळेवाडीकर, माधव कल्याणकर, राम मोतीपवळे , ज्ञानेश्वर पारसेवार आधी पुढाकार घेत आहेत.

**मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने आयोजित या चित्रप्रदर्शनास आज विद्यार्थ्यांसह भेट दिली. एका दुर्लक्षित लढ्याचा चित्रमय व ऐतिहासिक वारसा या निमित्ताने पहावयास मिळाला. मार्गदर्शक धनंजय गुडसूरकर सरांनी मुक्ति संग्रामाच्या दिशेने केलेले मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरले.**

**– कल्पना चौधरी –**

**प्राचार्य, माउंट लिटेरा झी स्कूल उदगीर**